
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं. ८८५

— मुलांमुलींचा —

# श्रीसमर्थ मेळा

## १९२८ सालची

# पद्यावली



REFBK-0003701

प्रकाशक—त्र्यंबक गणेश बापट, १९८, शुक्रवार, पुणे.

किंमत ४ आणे

3 6097

REFBK-0003701

श्री

## शिवकालीन ऐतिहासिक संवाद.

# सिंह सुटला.

## किंवा

## मोगली मसलतीवर मराठेशाहीची मात

ले. भा. वि. देवासकर. B. A. बडोदें.

### प्रवेश १ ला.

**स्थळः**—[ रायगड किल्याचा पायथा ]

( एक नाईक घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करितो. )

नाईक:—सबंध रान पालथें घातलें, पण स्वारीचा कुठें पत्ता नाहीं. मोठ्यांचीं पोरं राखण्याची ही नोकरी म्हणजे सुळावरची पोळी ! या मुलांच्या मागें धांवण्यांत आमचीं म्हातरीं हाडें कशीं टिकावींत? अयाईई! ! सांधेन् सांधे ठणकताहेत. या बाजूला एक वाघरूं आलें आहे म्हणतात. [ पडद्यांत वाघाची डरकाळी ] अरे बापरे, वाघोबाची डरकाळी ही ! अंबाबाई आतां माझी लाज तुलाच. आतां काय करावें? बाळराजे, अहो,बाळराजे, होऽहो......

संभाजी:—काय हो केव्हांची आरडाओरड चालविली आहे ? जरा कुठें नजरेआड झालों तर सारें रान डोक्यावर घेतलें. काय काम आहे तुमचें ?

नाईक:—माझें गरिबाचें काय काम असणार? (हात जोडून भीत भीत) म्हटलें महाराजांनीं आतां परत चलावें किल्याकडे—

संभाजी:—मी नाहीं येणार किल्ल्यावर.मला त्या समोरच्या झाडींत शिकार शोधायची आहे. या रायगडावर आल्यापासून चांगलीशी शिकार मिळाली नाहीं.

नाईक:—आपण नाहीं येत राजे ? महाराज रागावतील बरें.

संभाजी:—म्हणे महाराज रागावतील.कध्धीं कध्धीं रागवायचे नाहींत. मुलांनीं घरकोंबडें होणें आबासाहेबांना बिलकूल पसंत नाहीं. जा, वर जाऊन तेवढा माझा तिरकम्ठा घेऊंन या.

नाईक:—( स्वगत ) आतां काय करावें ? स्वारी अगदीं हट्टास पेटली आहे.

संभाजी:—नाईक, कसल्या विचारांत पडला आहांत येवढे. हां समजलों; आम्ही मोठ्यांचीं पोरं. आम्हांला एकटें दुकटें कसें तुम्ही फिरूं द्याल. आमच्यावर तुमची नजरकैद असायचीच. कां असेंच ना ?

नाईक—बाळराजे—

संभाजी—तें कांहीं नाहीं.चर जाऊन माझा तिरकमठा घेऊनया लवकर.

नाईक—पण—

संभाजी—मला आतां कांहींसुद्धां ऐकून घ्यायचें नाहीं. ( पडद्यांत डरकाळी ) ही पहा वाघाचीच डरकाळी. चला पळा लवकर. (तो रेंगाळतो) कसलीं ढिलीं माणसें मिळालीं आहेत माझ्या तैनातीला ! नाईक—

नाईक—हा चाललोंच मी राजे. ( मुजरा करतो. व जातां जातां स्वगत ) मासाहेबांच्या कानीं घालावें म्हणजे आपली जबाबदारी संपली.

संभाजी–(हंसून) म्हणे परत फिरा वाड्याकडे. वाघसिंहांची ज्यांना भीति वाटते त्यांनीं बसावें पाहिजे तर घरांत दडून. या संभाजीला आबासाहेबांसारखा पराक्रम गाजवायचा आहे. ( कमरेची तलवार काढून ) गेल्या दसऱ्याचे मुहूर्तावर आईसाहेबांनीं मला ही तलवार दिली, ती कांहीं नुसती शोभा म्हणून कमरेला लटकावयाला नाहीं. ( तिच्याकडे पहात ) किती पाणीदार आहे ही ! !

१ पद:—चाल ( अंति आनंद फुलवि कलिका )

प्रिय तलवार गमे मजला । कशी नाच करि, करिं मम
चपला । रुधिर हिजसी प्रिय; म्हणुनि घडावि नित,
रुधिर-स्नान रणिं रिपुला ।। धृ० ।। पडत विसर मज,
नच कधि पळभर । सुचे न हिजविण मजला; करी
असिलता ही नाचवितां, किति जन मोक्ष पावला ।। १ ।।

आज आतां एखाद्या तरी वाघोबाचें रक्त पाजल्याशिवाय हिला म्यानांत विश्रांति घेऊं द्यायची नाहीं. ( तलवार फिरवीत पळत जातो. )

---

प्रवेश २ रा.

[ **स्थळ**:—रायगड जवळच्या एका गांवाची वेस. ]

[ सुभानराव हातांत तलवार घेऊन पहारा करीत आहे. ]

सुभानराव:— २ पद:—चाल ( नारी नर सकळ जुगारी... )

**झाली पुरे ताबेदारी, नग नोकरी ।।धृ०।। मिळत नच जिवां,मुळिंहि विसावा; झालें दैव फरारी । नरकवास हा येत कपाळा, काय जहाली मम गुन्हेगारी ।। नग नोकरी० ।।१।।** (इकडे तिकडे येरझाऱ्या घालीत)

काय त्रास हा ! हे मोंगल येणार, आमच्या मुलखावर स्वारी करणार, म्हणून आज एक ना दोन, आठ दिवसांपासून वरड उठलिया पन अजून बेटे हे कसे उगवत नाहींत ! भारीच ढिले दिसताती ह्ये. हो—यायचें ठरलें तर आपलें पटकन् येऊन जावें—काय दोनचार हात तलवारीचे खेळायचे असतील ते खेळून घ्यावेत अन् व्हावें मोकळें. किती वाढूळ माणसानें ताटकळत बसावें यांच्यापायीं ? पहाऱ्यावरल्या या येरझारीनें जीव कसा अगदीं रडकुंडीला आलाय—उरावर तलवार आन् शिरावर ही जोखीम—किती दम खावा माणसानें—डोळे वढवढून रात तर कशी बशी लोटली पन आतां आपल्या 'बा' च्यानें नाहीं रहावत झोंपल्याविना. [ वर न्याहाळून ] अबब ! ! दिवस किती वर आला. भर मध्याह्नीच्या या वख्ताला भाकरी खायची सोडून, कशाला येतोय दुष्मन—इकडे—मरायला ? मला पाहऱ्यावरून सोडवायला हा गाढवाचा लेक महादबा कसा येत नाहीं अजून ? ( जांभई देतो व चुटकी वाजवितो. ) पडावेंच पासलें झालें. इतकेंही करून आलाच दुष्मन् तर नशीब ह्या गांवचें आन् गांवकऱ्यांचें. ( आजुबाजूला पाहून आडवा होतो. ) जय आई अंबाबाई—हा तुझा भक्त जरा ध्यान धरून पडताय्—त्याच्यावर तुझा जागता डोळा असूं दे. ( झोंपीं जातो. )

हिरोजी:—( मुसलमानी वेषांत प्रवेश करून हलक्या आवाजानें ) हेंच तें अंबाबाईचें देऊळ देवळाजवळच पहारा असेल असें महाराजांनीं सांगितलें होतें, आणि येथें तर ( एकदम पलीकडे पाहून ) तें कोण निजलें आहे ? पहारेकरीच वाटतें—कोण अंदाधुंदी ही. उत्तरेची मोंगलाई या दख्खनमध्यें कशी शिरली ? निजणाराचें दैवसुद्धां निजतें म्हणतात. दख्खनचें दैव उठावें—महाराष्ट्राचा भाग्योदय व्हावा म्हणून शिवाजी महाराजांची

कोण जीवापाड धडपड—आणि अजून यांच्या डोळ्यावरल्या झोंपा उठत नाहींत ? ठीक आहे—स्वारीला चांगलाच धडा शिकविला पाहिजे. [ जवळ जाऊन त्याला उठवीत ] ए बद्‌माष कौन है तूं ?

सुभानराव:—( उठून घाबरून व तलवार हातीं घेत ) अरे बापरे—मोंगल आले वाटतें. मी—मी—मी या गांवचा प—प—पहारेकरी......

हिरोजी:—क्या नाम इस गांवका ? ये गांवमें एक खुपसुरत औरत छुपी हुवी आयी है. वो किद्‌र है—बताव मेरेकु—क्यौं अब्‌ तेरा मुह्‌ क्यौं बंद्‌ हो गया. बोलता है के जानसे मार डालूं.

सुभानराव:—अनाथ नाथे अंबे करुणा विस्तारीं. ( हिरोजी त्याला पकडून हिसडे देतो. ) नका मला—गरीबाला नाहक मारूं नका. तुमची औरत बिवरत ईश्वरसाक्ष सांगतों—मी पाहिली नाहीं. ( महाद्‌बा येतो व दचकून ओरडतो. ) महाद्‌बा अरे महाद्‌बा—मला सोडवायला फार लौकर आलास बाबा ?

हिरोजी:—चूप क्यौं खालीं बकवा कर रहा है. ये कोन तेरा साथीदार ( महाद्‌बा हात जोडून उभा राहतो. ) आव्‌ तुम्‌ भी इधर आव्‌. तेरेकुभी मिट्टीमें मिला देतां हुं. ( त्याला पकडण्यास जातो, तो पळूं लागतो, इतक्यांत हिरोजी मुसलमानी वेष काढून टाकून ) खबरदार एक पाऊल पुढें टाकाल तर. वा, सुभानराव चांगला पहारा करीत होता. महाद्‌बा,—( सुभानराव व महाद्‌बा दोघेही चकित होतात. )

महाद्‌बा:—हिरोजीराव—

सुभानराव:—कोण—हिरोजीराव—

हिरोजी:—चला बोलूं नका. शत्रूला पाहून पळून जाणारे भ्याड तुम्ही. तुमच्या हातून मित्राला काय मदत व्हावयाची आहे ? शिवाजीमहाराजांसारख्या मातबर माणसांनीं स्वदेशासाठीं—स्वदेशबांधवासाठीं, जिवाचें रान करावें आणि तुम्ही शिपायी गड्यांनीं शिलेदारी-मिजासीनें झोंपा काढाव्यात अँ ! मोठ्या शरमेची गोष्ट आहे ! ! उद्यां खरा दुष्मन्‌ येऊन तुमच्या उरावर बसेल तेव्हां तुमच्या डोळ्यावरल्या झोंपा उडतील. पहाऱ्यावरले शिपाई तुम्ही—अरे तुह्मा तर डोळ्यांत तेल घालून नोकरी बजवायला पाहिजे; सुभानराव, महाद्‌बा ही कां निजायची वेळ आहे?—

३ पद ( गजल )

निजायाची नसे वेळा । जागवा सुप्त वृत्तींना ॥ उठोनी सिंहसें सारे । दवडवा दूर भेकांना ॥धृ०॥ सोनियाची अशी संधी । लाभली पूर्वपुण्यानें । जरी निस्तब्ध बैसाल । तरी होईल हो दैना ॥ १ ॥ तुम्ही हो पुत्र आर्यांचे । तुम्ही हो पुत्र वीरांचे। तुम्ही चेले शिवाजींचे। उभारा कंदना सेना ॥ ३ ॥ उठा वेगें चला आतां । गाजवा माय-भूमीला । यशाचा गाजवा डंका । विश्व गाईल गुणगाना ॥ ४ ॥ स्वराज्याची सकाळ उजाडूं लागली आहे. या वेळेला तर आंगचा आळस झाडून, कमरा कसून, हातांतील समशेरी सरसावून तुम्ही देशकार्य करा-यला—आपली शिपाईगिरी गाजवायला तयार झालें पाहिजे. मी जातो, आतां यापुढें तरी नीट पहारा करा. [ जातो. ]

सुभानराव:—या झोंपेनें शेवटीं दिलाच दगा. आतां अगर्दी—कान धरला. पहाऱ्यावर म्हणून झोंपायचें नाहीं. महादबा सांभाळ बुवा, तुझ्या पहाऱ्यांत तरी आतां असला कांहीं प्रसंग न येवो.

४ पद–राव टाकुनशानी ख्वाप द्यावी। धरा कान सुस्ती सोडावी ॥ धृ० ॥ व्हा वीर घ्या समशेर । जा दुष्मन् टाका कापून ॥ १ ॥ ठेवा ध्यानांत माझी वाणी । चला धांवत मर्दावाणी ॥ २ ॥

महादबा:—मी काय सुभानराव लागलों होय. येऊं तर दे दुष्मन्. अस्सा चित करीन त्याला एका दमांत. ( सुभानरावाला पकडायला जातो. सुभानराव पळून जातो व महादबा पहारा करूं लागतो. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थळ:—किल्ले रायगड.

[ जिजाबाई व संभाजी बोलत येतात ]

जिजाबाई:—अहो चिमकुले तलवारबहाद्दर, ठेवून द्या आतां ती तलवार म्यानांत.

संभाजी:—हें हो काय आईसाहेब; आबासाहेब म्हणतात कीं तलवार शत्रूवर गाजवावयाची आणि तुम्ही म्हणतां कीं ठेव ती म्यानांत! मग दिलीत कशाला आम्हांला ती ? [ तलवार फेंकून देतो. ]

जिजाबाई:—[ फेंकलेली तलवार उचलून व त्याला जवळ घेऊन ] अगबाई, केवढा पण राग आला बाळराजांना ! शंभुबाळ, तलवार शत्रूंवर गाजवायची हें खरें ना ? तर मग ती अशी नुसती हवेंत कशाला फिरवावी?

संभाजी:—आम्हांला तुम्ही स्वारी शिकारीवर जाऊं द्याल तेव्हांना? घरांत कां कुठें शत्रू सांपडत असतो ? आईसाहेब धाडाल ना मला त्या मोंगलांकडे ?

शिवाजी:—( प्रवेश करून ) होय धाडूं बरें बाळ. ( जिजाईस वंदन करतो ) आईसाहेब. बरें कां शंभुबाळ, आतां आपल्याला लवकरच दिल्लीला जायचें आहे.

जिजाबाई:—शिवबा, औरंगजेबाकडे जायचा मनसुबा कायम केलास कां ?

शिवाजी:—होय आईसाहेब, अलमागिराची मनसबदारी पत्करून दिल्लीस जाण्याचें मी जयसिंगापाशीं कबूल केलें आहे.

संभाजी:—आबासाहेब, मी सुद्धां येईन दिल्लीला तुमच्याबरोबर. येऊंना आबा ?

[ तान्हाजी व हिरोजी प्रवेश करून सर्वांस मुजरे करितात. ]

तान्हाजी:—महाराज आम्हीसुद्धां येणार आपल्या बरोबर.

हिरोजी:—मासाहेब, दिल्ली दरबारांतील पाहुणचाराचा अनुभव आमच्यासारख्या शिपाईगड्यांना येरव्हीं कधीं येणार ?

जिजाबाई:—शिवबा हा निश्चय कायम ना ?

शिवाजी:—कायम नसेल तर मग तो निश्चय कसला ? तह केल्याशिवाय आपल्याला गत्यंतरच नाहीं. शत्रूच्या गोटांत शिरून बित्तंबातमी काढण्याची आलेली ही संधि मी कशी वायां दवडीन ?

तान्हाजी:—महाराज करा हुकूम या सेवकाला, दिल्लींतील खडान खडा माहिती काढून आणतों.

हिरोजी:—बोलण्याची माफी मिळावी; केवळ याच गोष्टीसाठीं महाराजांसारखें महत्त्वाचें मोहोरें इरेस घालणें बरें नव्हे खास.

जिजाबाई:—खरेंच शिवबा, तूं कशाला जातोस दिल्लीला ?

शिवाजी:—" तूं कशाला जातोस दिल्लीला " आईसाहेब आपल्या-

जवळ कारवाई करण्याचा माझा अधिकार नव्हे. तान्हाजीराव स्वत:चा देह झिजविल्याशिवाय अंगीकृत कार्याला सज्जनांची सहानुभूति कशी मिळेल? हिरोजीराव, संकटाशीं सामना केल्याशिवाय स्वातंत्र्याचा संसार थाटतां येत नाहीं.

जिजाबाई:—शिवबा—

शिवाजी:—नका आईसाहेब, आतां माझ्या या बेताचे आड आपलें पुत्रवात्सल्य आणूं नका.

तान्हाजी:—महाराज आमच्यासारखे अनेक सेवक आपल्या सेवेसाठीं—स्वदेशसेवेसाठीं—आपखुषीनें स्वप्राणांची आहुति देण्यास तयार असतांना,

हिरोजी:—आपण आपला जीव कां धोक्यांत घालतां?

शिवाजी:—तुमच्यासारख्या स्वार्थत्यागी माणसांना संकटाच्या उन्हांत उभें करून मी सुखाच्या सावलींत बसूं कां? तुमचा स्वार्थत्याग—

तान्हाजी:—महाराजांच्या लोकोत्तर स्वार्थत्यागापुढें आमच्या पामर-सेवेचा काय पाड? महाराष्ट्राची साताजन्मांची पुण्याई फळास आली आणि हा शिवावतार येथें झाला.

हिरोजी:—असल्या सामान्य कार्यासाठीं आपण हा बहुमोलाचा जीव—

शिवाजी:—धोक्यांत घालूं नका. तुम्हीं सर्वांनीं आज हें मांडलें आहे तरी काय? आईसाहेब जाऊं ना मी?

जिजाबाई:—शिवबा, तुझ्या पराक्रमाविषयीं किंवा कर्तबगारीविषयीं मला शंका आहे अशांतला भाग नाहीं. मला त्या कावेबाज औरंगजेबाच्या सचोटीचा संशय येतो. म्हणून म्हणतें तूं स्वत: गेला नाहींस तर नाहीं कां चालायचें?

तान्हाजी:—महाराज, या सेवकाला संधि द्या.

हिरोजी:—अलमगीराच्या कुटिल स्वभावाची ओळख महाराजांना आहेच.

शिवाजी:—आईसाहेब, तान्हाजीराव, हिरोजीराव, दांत धरून दंश करायला टपून बसलेल्या सर्पानें सलगीची फणा माझ्यावर उभारण्यास तयार व्हावें यांत कांहींतरी राजकारणी डाव त्या अलमगीराला खेळायचा आहे हें मी पूर्णपणें जाणून नाहीं असें कां तुम्हांला वाटतें? पण संकटाच्या नुसत्या

संशयानें जर आपण असे डगमगून जाऊं लागलों तर स्वराज्याविषयींचें आपण बांधलेले बेत सिद्धीस जाण्याची आशाच नको बाळगायला. श्रीभवानीच्या कृपाप्रसादानें मी आपली कामागिरी फत्ते करून येणार यांत अणुमात्र संशय नाहीं. जर कदाचित त्या अलमगीरानें कपट करून कांहीं दगा दिला तर त्यांत येवढें भिण्यासारखें काय आहे? स्वकर्तव्य बजावीत असतांना आलेलें मरण–

जिजाबाईः—इडापिडा टळो आणि अमंगल पळो.

तान्हाजी:—किती अभद्र बोलणें हें महाराज—

हिरोजीः—परमेश्वरा, आम्हां सर्वांचें संकलित आयुष्य महाराजांना दे. आम्हीं आपल्याला असें अभद्र बोलूं देणार नाहीं; महाराज आपल्या कर्तबगारीच्या जोरावर आपण दगडाद्गाडागणिक तान्हाजी हिरोजी उत्पन्न कराल. पण साताजन्मींच्या पुण्याईनें लाभलेले शिवाजीमहाराज महाराष्ट्राला पुन्हां मिळायचे नाहींत.

शिवाजी:–(जिजाबाईपुढें गुडघे टेकून)शत्रूच्या घरीं पाहुणचार घ्यायला चाललेल्या ह्या आपल्या पुत्राला आईसाहेब, आपण आशिर्वाद देतां ना?

स्वामी:—( प्रवेश करीत )

मना मानसीं व्यर्थ चिंता वहाते। अकस्मात् होणार होऊनि जाते।
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें। मतीमंद तो खेद मानी वियोगें॥

जयजय रघुवीर समर्थ [ सर्वजण अनुक्रमानें नमस्कार करतात. ] कल्याण. तुष्टिरस्तु. पुष्टिरस्तु, शांतिरस्तु. हिरोजी, खरोखरच या महाराष्ट्राचें नशीब बलवत्तर म्हणून हें राजरत्न मराठेशाहीला लाधलें. शिवबा, आत्मस्तुती ऐकण्याचा प्रसंग आला म्हणून ओशाळूं नकोस. जिजाबाई, कां उगीच मनांत चिंता वहातां? तान्हाजीराव, आमच्या शिवबाचे प्राण कांहीं वाटेवर पडले नाहींत. काय ताकद लागली आहे त्या अलमगीराची कीं तो या शिवबाला, भवानीच्या भक्ताला, महाराष्ट्राच्या पंचप्राणाला अपाय करूं शकेल? शाबास शिवबा, केलास तो निश्चय योग्य आहे. मनीं दृढनिश्चयाचें बळ धरल्यावर विघ्नांच्या वावटळी काय हां हां म्हणतां विरून जातील. म्लेंच्छ मोगलांचें बहुतां दिवसांचें माजलेलें हें बंड आतां शमविलेंच पाहिजे. प्रसंग ओळखून नीट सावधपणें काम करशील तर तो श्रीरामचंद्र प्रभू तुझे करवीं अनेक लोकोत्तर चमत्कार घडवून आणील.

शिवाजी:—ईश्वराचा आशीर्वाद व आपल्या सारख्या साधुसंतांची सहानुभूति असल्यावर माझ्यासारख्या पामराच्या प्रयत्नाला सुद्धां परमेश्वरी-शक्तीचें बळ चढेल. आईसाहेब आपली अनुज्ञा मिळेल ना मला ?

जिजाबाई:—शिवबा, आईचें हृदय राहीना म्हणून बोललें महाराष्ट्राला स्वातंत्र्यदान करण्याचें भाग्य माझ्या शिवबाला लाधावें अशी तर या जिजाईची महत्त्वाकांक्षा आहे.

स्वामी:—जिजाऊ, तुम्हां सर्वांच्या भाग्यबलानें आणि श्रीरामचंद्रप्रभूच्या कृपाप्रसादानें तो आनंदाचा दिवस—महाराष्ट्र, आनंदवनभुवन होण्याचा दिवस लवकरच उजाडणार आहे.

तान्हाजी:—समर्थांची ही उक्ति म्हणजे महाराष्ट्राच्या भाग्योदयाची आकाशवाणीच होय.

हिरोजी:—थोरांची वाणी कधींही अन्यथा होत नाहीं.

शिवाजी:—स्वामी, मग अमलगिराकडे जाण्याची मला कधीं आज्ञा करितां ?

स्वामी:—शुभस्य शिघ्रम्. उद्यां सूर्यास्ताचे मुंहूर्तावर स्वारीची तयारी करा.( तान्हाजी हिरोजीकडे पाहून ) ह्यांना बरोबर नेणार ना ?

शिवाजी:—प्राणांशिवाय नुसत्या शरीराची हालचाल कशी होणार ?

संभाजी:—आबासाहेब, मीं सुद्धां येणार तुमचे बरोबर दिल्लीला.

स्वामी:—( कौतुकानें ) तुम्हीहो कशाला जाणार तेथें ?

जिजाबाई:—शत्रूवर तलवार गाजविणार आहेत.

शिवाजी:—शत्रूच्या ऐवजीं स्वतःच जमिनीवर लोळण घेतील झालें !

संभाजी:—आबासाहेब, तुम्हांला खोटें वाटतें कां ? दिसूं तर द्या तो अवरंगजेब. या तलवारीनें अश्शी त्याची गर्दन उडवून देईन.

स्वामी:—( त्यास जवळ घेऊन शाबासकी देत ) शाबास बेटा. ‘ सिंहाचा छावा ’ शोभतोस खरा. शिवबा, घेऊन जा या छोट्या वीराला तुझ्याबरोबर. आमच्या महाराष्ट्राचें बालतेज कसें आहे तें पाहूं दे एकदां त्या अलमगिराला. काय जिजाबाई खरें ना मी म्हणतों तें ?

जिजाबाई:—आपल्या इच्छेबाहेर आम्ही कुठें आहोंत स्वामी ? शिवबा खुशाल घेऊन जा शंभु बाळाला.

शिवाजी:—जशी आईसाहेबांची आज्ञा.

स्वामी:—ठीक आहे. येतों तर आम्ही. आमची ध्यानधारणेची वेळ झाली. [ सर्वजण नमस्कार करितात.] कल्याण. जा. शिवबा, दिल्लीश्वराला महाराष्ट्राचा गनिमी कावा दाखवून ये. अंगीकृत कार्यांत तुझा विजय असो.

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा। उडी घालितो संकटीं स्वामी तैसा।
हरीभक्तिचा घाव घालीं निशाणीं। तुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥
जयजय रघुवीर समर्थ. [ जातो ]

संभाजी:—आईसाहेब मी बरोबर तीरकमठा घेऊं कां तलवार घेऊं? पोषाख कोणता घालूं? आबासाहेब, मी आपल्या नव्या घोडीवर येऊं ना?

शिवाजी:—आईसाहेब, नातवाच्या प्रवासाची तयारी करून द्या आतां. पहा कशी निकड लाविली आहे गुलामानें!

जिजाबाई—कां बरें लावणार नाहीं? माझें गुणाचें बाळ कसें तें, चल बाळ, मी तुझ्या प्रवासाची तयारी करून देतें.

[ संभाजीला घेऊन जाते. सर्व मुजरे करितात. ]

शिवाजी—हिरोजी, जा मोरोपंतांना उत्तरेकडील बारद्वारींत माझी वाट पहाण्यास सांग. त्यांच्या जवळ पुढील कार्यांचीं खलबतें करायचीं आहेत.

हिरोजी—जशी महाराजांची आज्ञा. [ मुजरा करून जातो.]

शिवाजी—[ गंभीरपणें ] तान्हाजी—मित्रा, आपण होऊन ही केवढी जबाबदारी मी आंगावर ओढून घेतली आहे हें तुला सांगायला नको. प्रत्येक पाऊल मोठ्या सावधगिरीनें टाकलें पाहिजे.त्या अलमगिराशीं गांठ आहे.

तान्हाजी—महाराज आपण निश्चिंत असा. अलमगिराशीं गांठ म्हणजे कांहीं काळाशीं गांठ नव्हे. शत्रूंशीं सामना करण्यासाठीं आपण हांक घालण्याचा उशीर, महाराज आपल्या हांकेला महाराष्ट्रांतलि मावळान मावळाच काय, पण सह्याद्रीची प्रत्येक कडेकपार हुंकार दिल्याशिवाय राहणार नाहीं. आपली पुण्याई थोर आहे. अखिल महाराष्ट्राच्या शुभइच्छेचें अभेद्य कवच आपल्या अंगांत असतांना तो अलमगीर आपल्याला काय करूं शकणार आहे.

शिवाजी:—तुमच्यासारखे शूर सैनिक हातांत शिरकमल घेऊन आत्मयज्ञ करण्यास तयार असल्यावर देशाचें दास्यविमोचन व्हावयाला—

स्वातंत्र्याचें साम्राज्य सुरू व्हावयाला कितीसा उशीर लागणार ? उद्यां आपल्याला निघायचें तेंव्हां आतां पुढील तयारीला लागा. येसाजीलाही बरोबर घ्यायचें आहे हें विसरूं नका. पुढील व्यवस्था मीं पाहतों. [ तान्हाजी 'जी' म्हणून व मुजरा करून जातो ] परमेश्वरा, तुझ्यावर भार टाकून या संकटांत मी बिनधोक उडी घेतली आहे. तारणें अथवा मारणें आतां सर्वस्वीं तुझ्या हातीं आहे.

५. पद चालः—( नृपममता रामावरती )

हीं पदीं प्रार्थना प्रभूजी । यशस्वीकृत कार्यामाजीं । मज मिळो ॥
भक्तांचे आपण वाली । आधार दुजा या कालीं । मज नसे ॥
आपुली कृपा शिरिं असतां । काळाचें भय ना चित्ता । वाटेंत ॥
हा दास । धरोनी आस । चरण-कमलास ।
विनवितों हेंच । राहुं द्या कृपा तुमचीच । मजवरीं ॥ १ ॥ [ जातो.]

---

## प्रवेश ४ था.

### स्थळः—दिल्लींतलि सय्यदुल्लाखानाचा वाडा.

(कासम प्रविष्ट)

कासमः—ये बडे बापके बेटेके ताबदारीमें एक दिन ये कासमका जान निकल जायगा. कुछबी करो—कितनीभी तकलीफ उठावो—इनकी तो मेरेपर हमीषां नाराजीही होती है. या अल्ला—या परवरदिगार—अभी ये कासमका किसमत कोन समालेगा ? ( विचार करून ) अफसोस—कासम—सय्यदुल्लाखान जादेका ये वफादार नौकर, ऐसी बेवफादारीकीं बाते कैसी बोल रहा है. नही नही—जान जायगा लेकिन ये कासम बेवफदार कभीभी नही होगा. [ रामसिंग व शिवाजी येतात]

रामसिंग—कासम

कासम—कोन रामसिंगजी, सलाम आलेकुम

रामसिंगः—तुम्हारे खानजादे अच्छी मिजासमे है के नहीं हम इनकु मिलने चाहते है.

कासम—गरीबपरवर मालीकने तो, किसीकुभी अंदर मत छोड ऐसा फर्मान ये बंदेकु दे दिया है. शिराजी शराबोके मस्तीमें मेरे मालीक नाच रंग

की मजा लूट रहे है.इसवास्ते आप हुजूर अंदर जा नहीं सकते.बंदा लाचार है

शिवाजी—( स्वगत ) सत्तेच्या जोरावर गरीब प्रजेला पिळून, उपटलेल्या पैशावर नाचरंग उडाविणारे हे हलकट उमराव—अरेरे यांच्या मनधरण्या करण्याचा प्रसंग आतां येणार. पण महाराष्ट्रासाठीं—माझ्या गरीब मावळ्यांच्या मुक्ततेसाठीं ह्यापेक्षांही जास्त अपमानास्पद प्रसंगांना तोंड देण्यास आतां तयार असलें पाहिजे.

रामसिंग—शिवाजीराजे, कसला एवढा विचार चालला आहे ?

कासम—( स्वगत ) क्यों, ये शिवाजी राजे—( न्याहाळतो )

रामसिंग—या दिल्लीदरबारच्या शिस्तीला [ एकीकडे ] गैरशिस्तीला, आपण आतां सादर झालें पाहिजे. क्यों कहते हो कासम—तुमारे खान नाचरंगमें मषगुल है और किसीकोभी मिलने नही चाहते ? पर मेरे दोस्त कासम, तुमारी मेहेरबानी जो हमारेपर हो जायगी तो इस वख्तभी खानके साथ हमारी मुलाखत हो सकती है. ( खिशांतून दोन रुपये काढून ) ये गरीबोंका नझराना तुम्हारेपर कुर्बान है हमारी मुलाखत तो होनी चाहीये.

कासम:—( स्वगत ) कासममिया अब क्यों बिचार कररहेहो ! अल्लाका फर्मान तो आ गया. ( उघड ) परवरदिगार ये बंदेकी लायखान कुछ बडी नही है. ( पैसे घेऊन ) हुजूर ये बंदेकी नौकरी निसारकिई है. अभी आपकी वर्दी दे कर आतां हूं [ धांवत जातो ]

रामसिंग—राजे एकवेळ दिल्लीश्वराची मर्जी संपादणें सोपें जाईल पण या उमरावांची लहरी तब्बेत सांभाळतां सांभाळतां नाकीं नव येतात.

शिवाजी—रामसिंगजी. मनाशीं मनसुबा करून एकदां घराबाहेर—स्वदेशाबाहेर पाऊल टाकलें त्यावेळींच आम्ही आमचा मानमरातब, लाजकाज सर्व कांहीं गुंडाळून ठेवलें. आपण कांहींही फिकीर करूं नका. आतां येईल त्या प्रसंगाला मुकाट्यानें तोंड देण्यास आमची तयारी आहे. आपण मात्र आमच्यासाठीं रात्रंदिवस इनकी तकलीफ घेतां, इतक्या कळकळीनें आमची बडदास्त ठेवतां याबद्दल मी आपले आभार कसे मानूं ?

रामसिंग—राजे—

कासम—( प्रवेश करून ) आपकु खानजादे अंदर बुलाते है. [ शिवाजी व रामसिंग जावयास निघतात ] आपकुही बुलाते है. हुजूर

बंदेकु माफ करना—इनकु नही बुलाते. [ रामसिंग शिवाजीकडे पाहतो ]

शिवाजी—रामसिंगजी खुशाल आपण आत जा. मी आपली वाट पहात इथेंच थांबतों. कोणत्याही प्रकारें मनांत संकोच मानूं नका. [ मी आलोंच म्हणून रामसिंग जातो त्याचे मागोमाग कासम जाऊं लागतो त्यास ] कासम जरा ठेहेरनातो. तुम्हारे साथ हंम बाते करना चाहते है. [ त्याच्याकडे टक लाऊन पाहतो ]

कासम—( स्वगत ) ये कोन शिवाजी—हमारे शहान्शाहाकेसाथ झगडा करनेवाला मर्द मरेठा ! इसीने मेरे आंखोंमे क्यां जादू डाला कोन जाने, इन्को देखकर मेरा दिल इनकी तरफ क्यों खीचाता है ?

शिवाजी—खाली बाते करने की भी मेहेरबानी हमारेपर नहि होंगी कासम ? कासम ?

कासम—काय शिवाजीराजे—

शिवाजी—( आश्चर्यानें ) काय ऐकलें हें मी ? दिल्लीदरबारांतील एका बड्या उमरावाच्या वाड्यांत मराठी बोली बोलणारा हा कासम—खरोखर कासमच आहे कां ?

कासम—नाहीं, राजे, हा कासम जातीचा मराठा आहे.

शिवाजी—काय कासमचें अंगांत मराठी रक्त खेळतें आहे ? मग मघां रामसिंगाजवळून लांच घ्यायला हा मराठी मावळा कसा तयार झाला ? कासम—अरेरे त्या यवनी नांवानें, माझ्या जातिबांधवाला विटाळायला माझी जिव्हा धजत नाहीं.

कासम—राजे—

शिवाजीः—मित्रा, तुझी मायभुमी स्वतःच्या कपाळीचें कुंकू कायम रहावें म्हणून तिच्या पुत्रांना कळवळून हांक मारीत आहे. पण त्या दीन दुबळ्या गाईचा तो हंबरडा दिल्लीपर्यंत कासमच्या कानीं कसा यावा ? धान्य-पूर्ण अशा स्वतःच्या जन्मभूमींत अन्नान्नगत होऊन भुकेनें तडफणारा तुझा मावळी बंधुवर्ग—दिल्ली दरबारच्या दिमाखानें दिपलेल्या तुझ्या डोळ्यांना कसा दिसणार ? बंधो, त्या महाराष्ट्रमातेला—जन्मदात्या—आईला आशेचा हात देण्याचें सोडून त्या तुझ्या अर्धपोटी राहणाऱ्या देशबांधवांना घांसभर

अन्नाला लावण्याचें सोडून, कासम, दुष्मानाच्या देवडीवर दिला तुकडा चव-ळत पडण्यांत तुला धन्यता वाटावींना ? कासम—

कासमः—नका शिवाजीमहाराज, आतां यापुढें या कासमला आपल्या जातिबांधवाला असें टोंचून बोलून अधिक लाजवूं नका. महाराज, ज्यांना आपल्या मुसलमानी नांवामागें मराठी बापाचें नांव लावतां येईल अशी किती तरी पोरें या दिल्ली शहरांत आहेत. माझ्या आईबापाचें काय झालें कुणास टाऊक ? पण या सय्यदुल्लाखानानें मला गुलाम म्हणून पदरीं ठेवून आज बरींच वर्षें झालीं. खाल्ल्या अन्नाला बेईमान व्हायचें नाहीं, हें मरा-ठ्याचें ब्रीद्—त्याला जागण्याकरितां आजपर्यंत या देहानें गुलामगिरींत दिवस काढले. हें अपमानाचें जिणें काढलें. परंतु आज आपल्याला पाहिल्याबरोबर आपले जळजळीत शब्द ऐकल्याबरोबर या कासमचें आजवर निजलेलें मृत-प्राय झालेलें मराठी मन पुन्हां जागें झालें आहे. आजपासून या गुलामगिरीला या मराठ्याचा कायमचा रामराम.( गुडघे टेकून ) महाराज मला पदरीं घेऊन पावन करा.

शिवाजीः—( त्याला उठवीत ) नाहीं कासम, अजून तुला या नोक-रीला अखेरचा रामराम ठोकतां यायचा नाहीं.

कासमः—महाराज, तें आतां कधींही शक्य नाहीं. प्राण गेला तरी येथें यापुढें हा कासम नोकरीला राहणार नाहीं.

शिवाजीः—कासम जरा शांतहो आणि मी काय सांगतों तें ध्यानीं घे. सांप्रत कांहीं दिवस तुला सय्यदुल्लाखानाजवळ ठेवून घेण्यांत मला मोठें राज-कारण साधायचें आहे. ते पहा रामसिंगजीच इकडे येत आहेत. तेव्हां चला आपलें झालेलें सर्व भाषण विसरून जाऊन पूर्वीप्रमाणें तूं पुन्हा कासम हो. कसा आजरात्रीं मला चांदणी चौकांत भेट म्हणजे सर्व कांहीं मी तुला समजा-ऊन सांगेन. ( रामसिंग येतो ) काय रामसिंगजी झाली का आपली मुलाखत ?

रामसिंगः—राजे, येथपर्यंत येण्याचे आपले श्रम फुकट गेले. खान-साहेब शराबच्या धुंदींत गाफल होऊन पडले आहेत. तरी पण उद्यांच्या दर-बारला आपल्याला नेल्याशिवाय मी रहात नाहीं ( कासमला उद्देशून ) क्यों कासम तुम क्यों चुपचाप मुंह छूपाकर बैठ रहे हो ?

शिवाजी:—क्यॉं करेगा बिचारा ! दुसरेकी ताबेदारी उठानें में दुसरा क्यॉ मिलता है. दिलकी नाराजी छुपाकर दुसरेका बंदेनें ऐसाही चुपचाप बैठना चाहिये. चला रामसिंग आपण आतां पुढल्या व्यवस्थेला लागू.

रामसिंग:—अच्छा कासम, खुदाहाफिझ.

कासम—खुदा आपकी गद्दी गुलजार रक्खे.

शिवाजी—तेरे जैसे अच्छा लडकेका अल्ला कभीभी बुरा नहीं करेंगा।

( रामसिंग व शिवाजी जातात )

कासम—कैसे हुशियार अदमी है ये. किती धूर्तपणानें त्यांनीं मला इषारा दिला ? दिलकी नाराजी छुपाकर दुसरे का बंदेनें ऐसाही चुपचाप बैठना चाहिये. आतां माझे डोळे उघडले.

६ पद चाल ( प्रभूजी आतांचि )

दिल हो गया दिवाना । पलटा गया जमाना ।। धृ० ।।
दुष्मन्की ताबेदारी । अब छोडके इसीको
अपने हि घरकू जाना । पलटा गया जमाना ।। १ ।।
अब नहि रहीम मेरा । मुझे तो राम प्यारा ।
परदेश छोड देना । पलटा गया जमाना ।। २ ।। [ जातो. ]

---

## प्रवेश ५ वा.

( दिल्लींतील शिवाजीच्या तैनातीला दिलेला वाडा )
( तान्हाजी प्रविष्ट )

तान्हाजी:—आमच्या वाड्याभोंवतीं सशस्त्र शिपायांचा जागता पाहरा ठेवून अलमगीरानें आम्हांला नजर कैदेंत ठेवलें ही अनिष्ट बातमी महाराजांना कळली असेल कां ? कळली नसेल तर ती मी त्यांच्या कानीं कशीं घालूं ? ज्यांना दाबून टाकण्यासाठीं विजापूरच्या आदिलशाहीचे व दिल्लीच्या बादशाहतीचे आज कित्येक दिवसापासून अटोकाट प्रयत्न चालले आहेत ते शिवाजी महाराज अनायासें अशा असहाय स्थितींत हातीं सांपडले असतांना त्यांना सुखासुखी पुन्हां दक्षिणेंत जाऊं देण्याइतका अजागळ अलमगीर खास नाहीं. अरेरे !

पद ७ वें चालः—( हीन दशा ही कशि रुचत मना )

**झाली आमुची अति करुण दशा । कपटानें अरि डाव जिंकितो ।**
**भालिं येत परवशता ईशा ॥ धृ० ॥ काय असा अपराध जाहला ।**
**म्हणुनि आम्हावर धरिशीं रोषा ॥ १ ॥ स्वातंत्र्याचें सौख्य दाखवी ।**
**तोडि तोडि झडकरी या पाशा ॥ २ ॥**

आई जगदंबे, स्वदेशभक्तीनें प्रेरित होऊन, जिवाच्या हौसेनें बाळपणापासून आरंभिलेला हा 'स्वराज्याचा लढा' शिवाजीमहाराज अटकेंत सांपडल्यामुळें आतां इथेंच थांबणार कां ? स्वर्गींच्या स्वातंत्र्यप्रिय देवतांनों ! स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं पेटविलेली देशाभिमानाची ज्योत, भोसले कुलदीपकाच्या बंदीवासानें अशी अकालीं मालवणार तर नाहीं ना ? ( शिवाजी मागें येऊन उभा राहतो. ) शिवशिव ! ! ( डोकें दाबून उभा राहतो. )

शिवाजी—कां तान्हाजीराव–( तान्हाजी दचकतो व मुजरा करतो ) शिवाची आठवण झाली आज ?

तान्हाजी—( स्वगत ) अशीव ओढवलें म्हणून. आतां ही बातमी मी महाराजांना कशी निवेदन करूं,

शिवाजी—तान्हाजी, अंतरींची खळबळ प्रगट करण्यासाठीं सरसावणाऱ्या जिव्हेला दाबून धरण्यांत काय पराक्रम आहे ? तान्हाजी बोल, ओठावर अडखळणाऱ्या शब्दांना उगाच कां बंदी करतोस ?

तान्हाजी—महाराज, बंदीवासाच्या दुःस्थितीची कल्पना आजपर्यंत माझ्या जिव्हेला नव्हती.

शिवाजी—तान्हाजीसारख्या साध्या शिपाईगड्यालासुद्धां स्वभाषेवर शाब्दिक अलंकारांचीं लेणीं चढवावींशीं वाटतात हा दिल्लीदरबारच्या विलासी वातावरणाचा तर परिणाम नव्हे ?

तान्हाजी—तेवढें भाग्य कुठें आहे या भूमीचें? महाराज, दिल्लीचें हें मोंगली साम्राज्य पवित्र असतें, तर पुण्यश्लोक पांडवांच्या ह्या पवित्र इंद्रप्रस्थांत आपल्याला कैद करण्याची दुर्बुद्धि—

शिवाजी—काय म्हणतोस, तान्हाजी, मी दिल्लीश्वराच्या कैदेंत आहे?

तान्हाजी—दुर्दैवानें 'हो' म्हणण्याची वेळ आली आहे खरी. (बोटानें दाखवून) तो पहा, महाराज, आपल्या वाड्याभोंवतीं पडलेला सशस्त्र सैनिकांचा गराडा ?

शिवाजी—[ खिडकींतून पाहिलेंसें दाखवून ] असें—एकूण माझा कयास अखेर खरा ठरला तर ? तान्हाजी, त्यांत तुला वाईट तें काय वाटलें? अरे आपण आपल्या पायीं चालून दिल्लीस आलों. ह्या संधीचा फायदा घेऊन अलमगीरानें आपल्याला जर कैदेंत टाकलें नसतें तर त्याच्या मूर्ख-पणाची कमाल झाली असती. (गंभीरपणानें) अन्तःकरणांतील राष्ट्रभक्तीच्या भावना तावून सुलाखून असल्याच कैदखान्यांत सतेज होत असतात. वेड्या, संकटाशिवाय स्वातंत्र्याला मोल नाहीं.

तान्हाजी—(स्वगत) संकटाच्या प्रत्यक्ष दर्शनानें ज्याचें धैर्य अणु-मात्रही ढळत नाहीं असा हा धीर पुरुष मराठेशाहीचा मालक होण्यास सर्व-थैव योग्य होय.

शिवाजी—तान्हाजी, अजून तुझ्या मनाची चलबिचल होते आहे. अलमगीरानें आपल्याला कैदेंत कोंडलें म्हणून आपण थोडेच याठिकाणीं डांबून राहणार आहोंत ! त्यानें त्याचा डाव साधला—आपण कांहीं हातीं कांकणें भरलीं नाहींत. बाबारे, राजकारणाच्या या कुटिल खेळांत, अशी 'देवाण' 'घेवाण' चालायचीच. शत्रूंच्या कोंडींत सांपडलें असतांही, त्याच्या हाता-वर तुरी देऊन, त्याच्यावर मात करून निसटून जाण्यांतच खरा मर्दपणा आहे. तुम्हां संवगड्यांच्या जीवावरच ना आम्ही हा खेळ आरंभिला ? तुम्हीच जर अश्या आणीबाणीच्यावेळीं गांगरून जाऊं लागलांत, तर मग कशाचें स्वराज्य, आणि कुठली हिंदुधर्माची संस्थापना ?

तान्हाजी—महाराज, क्षमा करा. संकटसमयीं मनाची रेसभरही चलबिचल होऊं न देण्याइतकी हिंमत माझ्या अंगीं नाहीं. पण क्षणापूर्वी हतबल झालेला हा तान्हाजी, महाराज, आपल्या धीराच्या शब्दांनीं आतां धैर्याचा मेरू बनला आहे.

संभाजी—(लगबगीनें प्रवेश करून) आबासाहेब मी नाहीं येणार पुन्हां त्या अलमगीराच्या दरबारांत.

शिवाजी—अरे पण तुला सांगितलें कोणी जायला !

संभाजी—सांगितलें नाहीं पण आतां चल म्हणाल. ते पहा, बाबा अवरंगजेबानें आपल्याला नेण्यासाठीं कितीतरी शिपाई पाठविले आहेत.

तान्हाजी—( स्वगत ) किती निष्पाप बालहृदय हें !

शिवाजी—वेड्या तें लष्कर, आपल्या तैनातीला कां पाठविलें आहे ? हे सैनिक आपल्या वाड्याभोंवतीं पाहरा करीत आहेत. शंभु, आजपासून आपण त्या अलमगीराचे कैदी झालों आहोंत.

संभाजी—( त्वेषानें )काय, आबा, त्या दुष्टानें आपल्याला कैद केलें? आबासाहेब, उगीच तुम्ही काल मला थांबविलें, नाहींतर या समशेरीनें त्या अलमगीराची गर्दन भरदरबारांत कालच मी उडवून टाकिली असती. आम्हांला कैद केलें काय ! अस्सा जातों–आणि त्या दुष्टाच्या रक्तानें राजवाड्यांतील जमीन लाल केल्याशिवाय परत येतच्च नाहीं. (जाऊं लागतो )

शिवाजी—( त्यास अडवून ) शंभू शंभु, असा बेफाम होऊं नकोस, अविचारानें कोणतीही गोष्ट करणें चांगलें नाहीं. काल भर दरबारांत तूं दिल्लीश्वराचा उघड उघड अपमान केलास, त्यानेंच हें फळ. उगाच संतापानें मस्तक तापवून घेऊं नकोस. तान्हाजीराव, जा. बाळराजांना आंत घेऊन जा, आणि त्यांच्याजवळ शांतपणाच्या गोष्टी बोलत बसा. आणि हे पहा पलीकडच्या दालनांत मी एक थैलीबंद लखोटा ठेविला आहे तो आतांच्या आतां आईसाहेबांकडे रवाना करा.

तान्हाजी—( मुजरा करीत ) जशी आज्ञा महाराज. चला बाळराजे येतांना तिकडे ?

संभाजी—आबासाहेब, मी मुजरा करतों. ( मुजरा करून संभाजी व तान्हाजी जातात. )

शिवाजी—दीर्घायु व्हा आणि मराठेशाहीची वढती करा. ( गंभीरपणें ) शेवटीं अलमगीरानें आपला डाव साधला तर ? पण त्यानें साधला म्हणण्यापेक्षां आम्ही त्याला साधूं दिला हेंच खरें ! त्याची मनसबदारी पत्करून आम्ही जर दिल्लीस आलों नसतों तर त्या अलमगीराची काय प्राज्ञा होती या शिवाजीला कैद करण्याची ? राजकारणाचा हा डाव गुंतागुंतीचा होऊं पहात आहे. आई जगदंबे, भक्ताच्या हांकेला धांवून येण्याचें तुझें ब्रीद तूं विसरणार नाहींसना ? ( कासम येऊन मुजरा करतो ) कोण कासम ?

कासम—होय, हुजूर मीच आपला सेवक कासम.

शिवाजी—भवानीनें कौल दिला आणि कासम तूं आलास ? कांहीं अकल्पित नेमानेम घडून येणार आणि माझी दिल्लीहून सुटका, कासम, तुझे हातून होणार. पण कासम येवढ्या कडेकोट बंदोबस्तांतून या कैद्याची......

कासम—आपण कैदी आणि कुणाचे ?

शिवाजी—दिल्लीश्वराचे ! आजपासून आमच्या वाड्याभोंवतीं लष्करी पहारा बसला आहे. तूं कसा आंत आलास ?

कासम—ही पहा आंगठी. ही दाखविली म्हणजे वाटेल त्याचा वाटेल तेथें वाटेल त्या वेळीं प्रवेश होऊं शकतो. पण आपल्याला कैद कां केलें ?

शिवाजी—कारण दिल्लीश्वराला तसें वाटलें ( विचार करून ) कासम माझें एक काम करशील का ?

कासम—महाराज असें कां बरें म्हणतां ? मला आज्ञा करा आपलीं अनेक कामें करीन. हिंदूधर्माच्या संस्थापनेसाठीं देह झिजविणारे आपण—आपल्या सेवेंत या यवनी अन्नानें विटाळलेल्या देहाचें सोनेंच होईल. महाराज, सांगा. आपलें काम बिनशर्थ सांगा—

शिवाजी—( कासमच्या कानांत ) हें येवढं जर साधलें तर कासम मजवर तुझे अनंत उपकार होतील.

कासम—महाराज—

हिरोजी—( प्रवेश करून ) आपल्या वाड्याभोंवतीं सशस्त्र शिपायांचा पहारा पडला आहे. माझ्याबरोबर सरकारवाड्यांतून सय्यदुल्लाखान आल्यामुळेंच मला आंत येतां आलें. पलीकडल्या दालनांत त्यांना बसवून महाराजांना वर्दी द्यायला मी इकडे आलों.

शिवाजी—तूं हो पुढें ( हिरोजी ' जी ' मुजरा करून जातो. ) कासम. जा तूं आतां. उद्यां मला भेट म्हणजे पुढील व्यवस्थेला लागूं. जा ईश्वर तुझें भलें करो. मी जातों आतां. (तांतडीनें जातो.) (कासम मुजरा करतो.)

कासम—इनके शब्दोंको मैं अल्लाका फर्मान समजतां हुं. अल्ला करे और ये शिवाजीमहाराज अलमगीरके कैदखानेमेंसे जल्दी छूट जाये. फिर ये कासम दिल्लीसे दखनकूं निकल जायगा. ( उड्या मारीत जातो. )

## प्रवेश ६ वा.

**स्थळ**:—दिल्लींतील शिवाजी महाराजांच्या कैदखान्याचें आवार.

( शिपाई प्रविष्ट. )

शिपाई:—शहान्शहाकी मेहेरनजर हासल करनेके लिये यह शिवाजी आज इतने दिन् हुवे बडे बडे अमीर उमरावोंके तरफ मिठाई भेज रहा है. आज तो बहोत बहोत बडे करंडे उसीने भिजवाये है. मिठाई बांटकर अलमगीर बादशाहका दिल को ललचाता है. लेकिन इस्कू इतना नही मालुम होता के हमारे बादशाहका पत्थर जैसा दिल कभीभी नरम नहीं होगा. इतकी मिठाई दररोज बाटता है लेकिन ए काफीर हमारे जैसे सीपाई लोगोंको थोडीभी नहीं खिलाता. कुच्छ हर्जा नहीं. अभी इसकु मीलनेके लिये जो कोई आवेगा उसकु हम नही अंदर—

कासम—( प्रवेश करून ) जाने देइंगे. सलाम् आलेकुम् बडेमिया. [ शिपाई तटस्थ उभा राहतो ] अरे यार हमारा सलाम तो ले लिये. फिर हम अंदर—

शिपाई:—नही जाने देऊंगा. कोन् तुम्. तुह्मारा अंदर क्या काम है.

कासम:—वो शिवाजीकी बीमारी कैसी है वो देखकर सय्यदुल्लाखान जादेकु—

शिपाई:—हम नही पिछानते. बादशाहका हुकूम हुवा है के किसीकोभी अंदर मत् छोडना. खास हुजूरही आज आनेवाले है. कलसे वो शिवाजीकी बुखार बढगई है.

कासम:—क्या कहतेहो. तो फिर मुझे अंदर जानाही चाहिये. जो वो शिवाजीको कुच्छ कम्जादा होगा तो हमारे खानजादे, बडेमिया, तुह्मारा और हमारा शीर काट डालेंगे. हमारा क्या जाता है. ये हम पीछे चले. अच्छा सलाम् आले कुंम बडेमिया [ सलाम करतो व आंगठी दाखवून जाऊं लागतो ]

शिपाई:—[ दचकून स्वगत ] ये तो खुद्द दरबारकी निशानी ( उघड ) अरे भाई जाव जाव तुम अंदर.

कासम—अब कायकू. तुम तो किसीकोभी नही पहेचानते. ए हम चले.

शिपाई—अरे यार मुझे माफ करना. तुम सय्यदुल्लाखान जादेके सच्चे अदमीहो ये हम क्या खबर. आपको मज्जाव किया ये मेरा बहोत बडा गुन्हा हो गया. बंदा लाचार है. मुझे माफ करना [ पायां पडतो ]

कासम—( स्वगत ) देखो यारो, ये कासमकी बढाई ( उघड ) अच्छा बडेमिया फिर ऐसी भूल मत करना. हम थोडी देरसे वापस आते है. सलाम आलेकुम ( जातो )

शिपाई—आलेकुम सलाम. वापस आना नही तो अंदर ही ठेहेर जाना. मुझे क्या काम है तुह्मारेसे. घंटा देड घंटा हो गया. गांजेका दम नही लगाया. चलो उधर एक तरफ जाकर थोडा शौख कर लेंगे. [ जातां जातां ]

लगाहै दमभी गांजेका । मजाहै उस्की मस्तीका ।।

( ही ओळ गजलच्या चालीवर गुणगुणत जातो. )

---

### प्रवेश ७ वा.

### स्थळः—( कैदखाना )

( हिरोजी आंथरुणावर पडला आहे. )

हिरोजी—( आजूबाजूस पाहून व उठून ) काय युक्ति पण युक्ति ! शिवाजी महाराज हातीं सांपडल्यामुळें दिल्लीश्वराला अस्मान ठेंगणें झाल्यासारखें वाटत होतें. पण महाराष्ट्रीय मुत्सद्देगिरीपुढें मोगली कावा कसा टिकाव धरणार ? दिवस बराच वर आला. महाराज यावेळेला सहज दिल्लीपार झाले असतील. त्याक्षणाची आठवण झाली कीं हृदय कसें आनंदानें भरून येतें. त्याक्षणीं—त्या मंगलक्षणीं—महाराष्ट्राचा मालक या यवनी तुरुंगांतून सहीसलामत बाहेर पडला. तो क्षण किती भाग्याचा ! आईजगदंबे ! केवढे हे तुझे आह्मां मराठ्यांवर उपकार ! घटका दोन घटकांनीं अलमगीर येथें येईल आणि आपला कट्टा दुष्मन निसटून गेलेला पाहतांच तो कडवा मुसलमान संतापानें आकाशपाताळ एक करून सोडील. चला आतां नेहमींप्रमाणें आजारी महाराजांसाठीं औषध आणण्याचें मिष करून आपणहि या कैदखान्याचा कायमचा निरोप घ्यावा. अरे ही चाहूल कुणाची ऐकूं आली. आलें वाटतें कोणी ( हांतरुणावर पांघरून निजतो )

कासम—( प्रवेशकरून ) महाराज—

हिरोजीः—( बुरखा काढून ) कोण कासम ?

कासम—हिरोजीराव, महाराजांच्या हांतरुणावर तुह्मी कसें ? वाड्यांत सामसूम कां ? महाराज कुठें आहेत ?

हिरोजी—( गहिंवरून ) कासम, कासम, खरोखर तूं केवढी कामगिरी बजाविली आहेस याची तुला कल्पना नाहीं. तुझ्या कामगिरीची हकिकत महाराष्ट्रांत पसरल्यावर महाराष्ट्रांतील मराठान मराठा, कासम, तुला कृतज्ञतेनें दुवा देईल. परोपकारी मनुष्या आपल्या या थोर कृतीनें उभ्या महाराष्ट्राला तूं उपकारबद्ध करून ठेविलें आहेस.

कासम—हिरोजीराव तुमच्या या बोलण्याचा मला कांहींच उमज पडत नाहीं. मी असें काय येवढें केलें कीं ज्यामुळें सर्व दख्खन माझा ऋणी होणार आहे.

हिरोजी—कासम, मेवामिठाईचें करंडे घरोघरीं पाठविण्याचा परवाना—

कासम—मींच सय्यदुल्लाखानाकडून मिळविला. बरें पण त्याचें काय?

हिरोजी—कासम काय सांगूं रे, तुझे तेच करंडे शिवाजीमहाराजांच्या सुटकेला कारणीभूत झाले.

कासम—( आनंदानें ) हिरोजीराव महाराज कुठें आहेत ?

हिरोजी—स्वदेशबांधवांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं स्वसुखावर, स्वप्राणांवर पाणी सोडणारांना मदत केल्याशिवाय तो सज्जनप्रिय प्रभू कसा राहील ? कासम, मेवामिठाईच्या करंड्यांत बसून महाराज बाळराजांसह या तुरुंगांतून...

कासम—बाहेर पडले, काय म्हणतां हिरोजीराव ?

हिरोजीः—गांवाबाहेर तान्हाजी येसाजी घोडे घेऊन उभे आहेत. [ पडद्यांत आवाज ] अहाहा ! परमेश्वरा केवढी थोर तुझी दया ! महाराज, आपल्या माणसांत जाऊन पोहोंचल्याचीच इषारत ही. कासम, आतां एकच अलमगीर काय पण असले छप्पन्न अलमगीर खुशाल येऊं देत. स्वजनांत जाऊन पडलेले स्वतंत्र झालेले शिवाजी महाराज, त्यांना बिलकूल जुमानणार नाहींत. चल, कासम आतां औषधें आणण्याचें निमित्त करून आपणहि बाहेर पडूं. तुला हि बरोबर आणण्यास महाराजांनीं सांगितलें आहे. येणार ना तूं महाराष्ट्रांत ?

कासमः—होहो. महाराष्ट्रांत—माझ्या जन्मभूमीमध्यें मी कसा येणार नाहीं ? अहाहा ? अल्लानें केवढी खैर केली ? चला हिरोजीराव; अरेच्या कोणी आलें वाटतें ? [ हिरोजी ‘ अरे देवा ’ म्हणून पांघरूण घेऊन निजतो व एक पहारेकरी येतो. ]

पहारेकरी:—शहान्शहाकी स्वारी नजीकही आयीहै. तुह्मारे शिवाजी को जरा हुशियार रखना. बादशाह अब्बी आयेंगे. ( जातो )

हिरोजी:—जा कासम जा. तूं लवकर बाहेर पड कसा.

कासम—आणि तुम्ही ?

हिरोजी—मी येथें थांबणार ? मी असा येथें पडून राहतों तितकाच महाराजांना दूर निघून जाण्यास अवकाश मिळेल. जा, कासम पळ लवकर.

कासम—पण बादशाह इकडे येतो आहे ना ?

हिरोजी—मग त्यांत काय झालें ? अजून तुला शिवाजी महाराजांच्या सेवकाची पुर्‍ी ओळख पटली नाहीं [ ‘ निगा रखो हुजूर. आस्तेकदम ’ अशी ललकारी ऐकूं येते ] जा कासम. जा. महाराजांच्या सुटकेला कारणीभूत झालेल्या परोपकारी कासमचा जीव फुकट खर्ची घालणें परमेश्वराला—महाराष्ट्राला—आवडणार नाहीं.

कासम—हिरोजीराव कां उगाच हट्टास पेटतां? माझा वेष घेऊन ह्या आगंठीसह तुह्मी येथून बाहेर पडा. कोणीहि तुह्माला हटकणार नाहीं. मी येथें तुमच्या जागीं निजतो. माझ्यासारखा यःकश्चित मनुष्य जिवंत राहण्यापेक्षां तुह्मी जीवंत राहिलांत तर स्वजनांच्या अधिक उपयोगी पडाल. [ ललकारी पूर्ववत ]

हिरोजी—कासम. वेळ आणिबाणीची आहे. आतां जर एक क्षण येथें गमावशील तर तुला माझी—

कासम—हिरोजीराव—

हिरोजी—महाराष्ट्राच्या प्राणाची—शिवाजीमहाराजांची शपथ आहे. जा असाच महाराष्ट्रांत जा व श्री जिजाबाई मातोश्रींना या मावळ्याचा अखेरचा रामराम सांग. आलेल्या मरणाला न भीतां—हा हिरोजी—जातिवंत मराठ्याचा हा शूर बच्चा—महाराष्ट्रराजलक्ष्मीचा हा बंदा नोकर कर्तव्य बजावीत

आनंदानें मेला हें वर्तमान सांगून महाराजांचे चरणीं माझा मुजरा सादर कर. [ ललकारी ] जा कासम जा, मरणकाळची येवढी तरी इच्छा तृप्त झाल्याचें समाधान या हिरोजीला लाभूं दे.

कासम—अल्लाच्या दरबारांत, हिरोजीराव, या तुमच्या दिव्य स्वामीभक्तीचें चीज झाल्याविना खास राहणार नाहीं. हिरोजीराव ( हिरोजीच्या-गळीं पडून स्फुंदत रडतो. ललकारी ऐकूं येते )

हिरोजी—कासम, नको नको अंत पाहूं असा. ( क्रोधानें ) कासम आतां एक क्षणभर जर येथें उभा राहशील तर तें या मानीं हिरोजीला खपणार नाहीं. ( कासम कष्टानें जातो ) कासम तर गेला. हिरोजी आतां तुझें काय होणार ? आपला सात जन्मीचा वैरी निसटून गेलेला पाहून संतापानें वेडा झालेला अमलगीर, माझ्या शरीराचे तुकडे तुकडे केल्याशिवाय राहणार नाहीं. अरेरे ! हिरोजी, काय तुझी ही दुर्दशा ? !! ( मस्तक दोन्ही हातानें दाबून ठेवतो. जरावेळानें ) कोण हिरोजीच बोलला कां हें ? शिवाजी महाराजांच्या या सेवकानें या मरणाला—स्वामीसाठीं येणाऱ्या मरणाला भ्यावें अँ ? फुकट हिरोजी, फुकट तुझा जन्म. त्यापेक्षां जन्मतां क्षणींच तूं कां मेला नाहींस ? ( ललकारी ) चल आतां मनाचा धडा कर आणि मर्दासारखा मरणाला तयार हो. ( अलमगीर शिपायांसह येतो. )

अलमगीर—किदर है वो शिवाजी ?

शिपाई—ए बेवकूब, देखता नहीं कौन् सामने खडे है ?

हिरोजी—दिल्लीचा यवनी सम्राट अमलगीर मजपुढें उभा आहे हें न दिसण्याइतके माझे डोळे आंधळे नाहींत.

शिपाई—फिर शाहान् शहाको कुर्निसात् क्यौं नहीं करतां ? ( हिराजीस्तब्ध उभा राहतो )

अवरंगजेब—मराठेकी सबही अवलाद कैसी कमजात होती है. ए पागल् किधर है वो शिवाजी—

हिरोजी—( स्वगत ) काय सांगूं मी आतां ?

अवरंगजेब—( शिपायास ) जाव उधर शिवाजी होगा उसकु इधर हमारे सामने लाव. ( शिपाई " जीहां हुजूर " म्हणून जातो ) क्या हुवा है तेरे शिवाजी को.

हिरोजी— ( स्वगत ) खरी गोष्ट ओंठाबाहेर पडण्याचा अवकाश; हिरोजी त्याक्षणींच तुझें आयुष्य संपणार ( उघड ) शिवाजी—( शिपाई येऊन भयभीत उभा राहतो. )

अवरंगजेब— ( शिपायास ) किधर है.

शिपाई—हुजूर उधर तो नहीं है दुष्मन्.

अवरंगजेब—फिर किधर है—

हिरोजी—तुमच्या हातावर तुरी देऊन शिवाजी महाराज दक्षिणेंत पळून गेले. ( शिपाई घाबरतो )

अवरंगजेब—( क्रोधानें ) क्या; भाग गया वो पागल्—

हिरोजी—खबरदार, त्या पवित्र नांवाला अपशब्दानें विटाळणाऱ्या जिव्हेला उखडून टाकल्याशिवाय हा हिरोजी कधींहि राहणार नाहीं—

अवरंगजेब—खामोष कौन् है उधर ( शिपाई हात जोडून पुढें होतो ) वो हरामी, ये अलमगीरके कैद्खाने मेंसे भाग जाताहै. बडी नामुष्कीकी बातहै. इतनेढीले मेरे लोग कैसे होगये ? जाव् सय्यदुल्लाखानको बुलाके इधरही ले आव.

शिपाई—जीहां हुजूर ( स्वगत ) अल्लामियानें खेर करी (जातो)

अवरंगजेब—अफसोस्. मेरा अलमगीरका नाक कांट कर वो दुष्मन् निकल् गया. कुछ् हरकत नाहीं. वो काफीर अस्मानमेंतो नहीं भाग गया. आद्मी भेजकर अबी इसको पकड लाता हूं. किद्र जायगा वो सैतान ( हिरोजी हंसतो ) बद्माष् मेरेकु हंसता है ?

हिरोजी—शिवाजी महाराज सुटले, मी आनंदानें कां हसूं नये ?

अवरंगजेब—ठेहरना, तेरी सब मस्ती निकालता हूं. हंसता है नहीं ? तेरे जैसे सैतानकू मारही डालना चाहिये. तेरे बदनके अब् टुकडे टुकडे करडालता हूं !

हिरोजी —दिल्लीश्वरा, करून टाक या देहाचे तुकडे, हा मी तुझ्यापुढें उभा आहे. बादशाह, सर्व सुखाची होळी करून जे आम्ही या स्वातंत्र्य युद्धांत सामील झालों आहोंत ते प्राणाच्या लोभानें स्वकर्तव्याला चुकूं असें तुला वाटतें ?

अवरंगजेब:—देखताहूं अब ये मरेठा कैसा मरनेकू तय्यार होता है? मरनेका वख्त जब आयगा तब ये बढाईके बाते सब ठंढी हो जायगी.

हिरोजी:—नाहीं. त्रिवार नाहीं. यवनेश्वरा, मराठ्याच्या मनाचा अद्याप तुला पुरता ठाव लागला नाहीं. देह जळेल पण महाराष्ट्रीयांच्या मनाचा पीळ सुटणार नाहीं. मरणाची भीति कुणाला दाखावितोस? मला—हिरोजीला —या शिवाजी महाराजांच्या सैनिकाला? राजा कर्तव्य करीत असतांना आलेलें मरण कधींही फुकट जात नाहीं. खुशाल मला मार. शिवाजी महाराज तर सुटून गेलेना? देशाकारितां—स्वराष्ट्राकरितां देह अर्पण करून हा भाग्यवान् हिरोजी देवेन्द्राच्या दरबारांत मानाची जागा पटकावील. मरणाची भीति मला का वाटेल? जोंपर्यंत श्रीशिवाजी महाराज महाराष्ट्रांत सहीसलाम आहेत तोंपर्यंत असे कितीहि हिरोजी तूं नाहींसे केलेस तरी त्यांची उणीव महाराष्ट्रांत पडणार नाहीं. मायभूमीकरितां देह सांडणाऱ्या या हिरोजीच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबागणिक सवाई हिरोजी उत्पन्न होऊन दिल्लीश्वरा तुझा सूड घेतल्याशिवाय कधींहि राहणार नाहींत. (गुडघे-टेकून) राजा घे हातांत समशेर आणि या स्वामिभक्त हिरोजीचें मस्तक एका घावासरसें कर धडावेगळें—

अवरंगजेब—हिंमतमर्दा तो मददखुदा. शाबास हिरोजी. तूं सच्चा शेरका बच्चा है. शिवाजी तो निकल गया. अब तेरी जान लेनेमे क्या हाशील है (सयदुलखान येतो व मुजरा करतो) देखो खान; देखो, ऐसे मरद, शिवाजीके खातर—आपने देशकेखातर जान देनेकुं जब तयार होतेहै तब ही देशकु अच्छे दिन आते है. शाबास है वो मर्द शिवाजी और उसका यह बहादूर सरदार; जा बच्या तेरेकु हम जानसे छोड देतेहै. अल्ला तेरा भला करे.

हिरोजी—दिल्लीश्वरा तुझें हें औदार्य खऱ्या वीराला शोभेसेंच आहे, पराक्रमापेक्षां मनाच्या ह्यामोठेपणानेंच तूं ह्या हिरोजीला जिंकले आहेस. स्वामीनिष्ठेच्या मोलानें स्वातंत्र्य विकत घेऊन स्वदेशी चाललेला हा मावळा तुला मुजरा करीत आहे. (मुजरा करतो)

---

## प्रवेश ८ वा.

### स्थळ:--रायगडाजवळील एका गांवाची वेस.

[ अंबाबाईच्या देवळाजवळ सुभानराव, चंद्रा, पुतळा, जानकी, येसू वगैरे मुली पूजासाहित्यासह प्रविष्ट ]

चंद्रा:—त्या मेल्या अवरंगजेबानें ऐनवेळीं दगा दिला अन् शिवाजी महाराजांना कैद केलें. कालच आमचे बाबा रायगडावरून आले त्यांनीं मला सांगितलें. अंबाबाई, महाराजांना सहीसलामत घरीं पोंचते कर; मीं तुला बारा नारळांचें तोरण बांधीन.

पुतळा:—खणा नारळांनीं मी तुझी ओटी भरीन.

जानकी:—माझ्या आईला सांगून मी तुझ्या नांवानें पांच सवाष्णींना सौभाग्यवाणें वाटीन.

येसू:—लक्षवातींचा अखंड नंदादीप मी तुझ्यापुढें जाळीन.

सुभानराव:—बायांनों !

पद ८ वें चाल—(या नवनवल नयनोत्सवा—)

**कां तुम्हि नवस करितां हिला । अजुनी झोंप सुखाची रुचते हिजला । कांहीं न सुचत जिवाला ॥ धृ० ॥ कलिकाळाचें लागुनि वारें । मानस बनलें कोरें । ब्रीद विसरली आपुलें सारें । अंबा या समयाला ॥ १ ॥**

वायफळ बोलद्वडणें आहे झालें. मोंगली मिजासीच्या वाऱ्यानें ही अंबाबाई चांगलीच झपाटली गेली आहे. निजूं द्या हिला सुखानें. दख्खनच्चें दैवच निजल्यावर हिनें तरी कां पेंगूं नये.

चंद्रा:—सुभानराव, आमची अंबाबाई कांहीं त्या सुभानअल्लासारखी सुखाला सवकलेली नाहीं.

पुतळा—आज मायाळु नी उद्यां झोंपाळु असे हरदम रंग पालटणारी आमची अंबाबाई नाहीं.

जानकी—आई अंबाबाई म्हणजे उभ्या महाराष्ट्राची कुळदेवता. कुळदैवताला दोष लावून, पापाचे धनी कां होता सुभानराव ?

येसू—संकटांवांचून सुख नाहीं नी परीक्षेवांचून प्रसाद नाहीं. माण-सानें जरा दमानें घ्यायला पाहिजे.

सुभानराव—कबूल. पण दम धरायला कांहीं तरी सीमा पाहिजे ना? बाकी तुलाच काय बोलायचें साऱ्या दख्खनला ही दमाची व्यथा लागली आहे. आतां मोंगलांनीं येऊन चांगले बेदम केल्याशिवाय आमचा हा दम निघणार नाहीं. ही अंबाबाई उभ्या महाराष्ट्राची कुळदेवता ना ? मग, या दैवताचा दासानुदास, महाराष्ट्राचा मालक–शिवाजीराजा, त्या अलमगि-राच्या अटकेंत आज किती महिने खिचपत पडला आहे, तें या अंबाबाईला उघड्या डोळ्यांनीं कसें पाहवतें ? [ हाताच्या बाह्या सांवरून व दंड थोप-टून ] काय करूं हो ! मला कोणी दिल्लीचा रस्ता दाखवील तर त्या दिल्ली-च्या दैत्याला—त्या अवरंगजेबाला—

मोंगल—( प्रवेश करून ) बोल, बोल तूं क्या करेगा. [ त्याला पकडतो. सुभानराव कापूं लागतो. मुली घाबरतात ) सैतान ठैर, तेरेकु दिल्लीका तो नहीं, बलके अस्मानका सीधा रास्ता बता देतां हूं. (त्याला मारतो)

चंद्रा—धांवाहो धांवा कोणी—हा मेला—

मोंगल—क्या; मेरेकु गालीआ देती हो. ठेरो तुम्हारीबी हड्डी नरम करतां हूं !

सुभानराव—( त्याच्याहातून सुटून ) अरे जारे माकडा—

मोंगल—( त्याला पकडून ) खामोश पागल मेरेकु बंदर केहेता है ! ( त्यांची झोंबी होते )

पुतळा—धांवाहो धांवा, हा पाहा कोण मेला सुभानरावांना मारीत आहे.

सुभानराव—मेरेकु मोकळा तो कर म्हणजे तेरेकु दाखवितो मर्दाचें पाणी—

मोंगल—नामर्द—

जानकी—अंबाबाई मेल्याचें निःसंतान करील.

येसू—मेल्या, अंबाबाई तुला पाहून घेईल.

मोंगल—अंबाबाईको मैं अब देखतां हूं ( देवळाजवळ जाऊन ) चल ए अंबाबाई मेरे साथ चल ( मुली घाबरतात ) तुझे मिट्टीका मजा

दिखाता हूं ( अंबाबाईला उचलणार इतक्यांत एक गोसावी प्रवेश करून त्याच्या पाठींत रद्दा देतो. मोंगल पडतो. )

गोसावी—अंबाबाईला तूं धूळ चारणार काय ? हात तर लाव त्या देवतेला—( सुभानराव खांकरतो ) तो अपवित्र हात तेथच्या तेथें कलम करून टाकीन.

मोंगल–होहोहोहो ! तुम तो बहोत घुस्से हो गये ( पुढें सरसावून ). क्यौं बे गोसावडे, बहोत मिजास बताता है ! खाली बकवा मत कर, सीधे रस्तेसे जैसा आया वैसाही चूप चाप चला जा.

. गोसावी—अरे जारे. माझ्या भगव्या वस्त्रावर जाऊं नकोस. वख्त आला तर ह्या भगव्या वस्त्रांतून सुद्धां मराठ्यांची माय भवानी प्रकट होऊन तुझे तुकडे तुकडे केल्याशिवाय कधींही राहणार नाहीं.

मोंगल—बाते तो बडी लंबी लंबी करता है. ऐ हैवान हुशियार हो जाव लढनेकुं. तेरा नापाक बदन जहन्में मिला देता हूं.

गोसावी—( कुबडींतून तलवार काढून ) चल ये असा पुढें. आणि ताकद असेल तर चालव तलवार या शिवाजीवर ( मोंगल तटस्थ होतो. )

सुभानराव—काय हे शिवाजी महाराज—

मुली—अगबाई भारीच आश्चर्य—

मोंगल—जिसकु पकडनेके लिये अलमगीर बादशाहनें बहोत बडा बक्षीस लगाया है वो कैदखानेसे भगाहुवा ये शिवाजी ? या अल्ला—

शिवाजी—आतां अल्लाचें नांव घेऊन स्वर्गांत जा कसा. ( झटापट होते. मोंगल पळून जातो. शिवाजी त्याच्या मागें जातो )

चंद्रा—सुभानराव बघतां काय असे ? तलवार घ्या अन महाराजांच्या मदतीला जा.

सुभानराव—( म्यानास हात घालून ) हो ! हो ! जा म्हणजे काय. हा चाललोंच मी.

पद ९ वें ( चाल—कां उगाच आतां )

बघा दावुन् येतो मी शत्रूला मर्दांचें पाणी ॥ धृ० ॥ करून श्यानी वार । दुष्मन् करिन ठार । समजु खोटी नका ही वाणी ॥ १ ॥ माझी करणी बघून् । राजे जातिल खुलून् । मग शोभेन मी सरदारावानी ॥ २ ॥

अरेच्या माझी तलवार कुठें गेली. ( गोंधळतो )

जानकी—वारे तलवारबहादूर ? तलवार घरीं—विसरलां वाटतें ?

पुतळा—मग नुसतें म्यानच कां कमरेला लटकावलें आहे सुभानराव?

येसू—आणि हेच असले वीर, अशा थाटानें मघां दिल्लीला जाणार होते !

सुभानराव—बायांनों ! माझी थट्टा करतां काय ? तलवारीवांचून अडणारा हा वीर नव्हे. हा चाललों मी महाराजांच्या मदतीला(जाऊं लागतो)

शिवाजी—( तलवारीला रक्त लागलें आहे असा प्रवेश करून ) अंबाबाईचा अपमान करणारांना ही अशी शिक्षा होते. ( देवीपुढें तलवार ठेवन ) जय भवानी, तुझी कृपा अशीच या दासानुदासावर राहूं दे. ( गुडघे टेंकून देवीस नमस्कार करतो )

सुभानराव—महाराज, हा सुभानराव आपल्याला मुजरा करीत आहे. ( तो मुजरा करतो व मुली नमस्कार करतात )

चंद्रा—सुभानराव, अंबाबाई नवसाला पावली ना आतां ?

पुतळा—ज्यांच्या सुटकेकरितां आम्हीं अंबाबाईची मनधरणी करीत होतों ते शिवाजी महाराज आपल्याला प्रत्यक्ष दिसले.

जानकी—आमच्या बाबांना हें शुभ वर्तमान समजतांच ते सहस्र भोजनें घालतील.

येसू—महाराजांना आई अंबाबाई उदंड आयुष्य देवो.

शिवाजी—( कुबडींत तलवार घालून ) मुलींनों ! या तुमच्या माझ्याविषयींच्या कळकळीबद्दल मी तुमचा फार ऋणी आहे. सुभानराव मी जातो आतां. ( जातांना स्वगत ) परमेश्वरा, महाराष्ट्राच्या या डोईजड ऋणांतून हा शिवाजी कसा मुक्त होणार. ( जातो )

चंद्रा—चला सख्यानों ! ही आनंदाची बातमी आपण सर्व गांवभर सांगत सुटूं.

पुतळा—महाराज सुटले म्हणून आजचा दिवस सर्व गांवभर जिकडे तिकडे आनंदी आनंद करूं या.

जानकी—हा दिवस आपण सणासारखा साजरा करूं.

येसू —ह्या आनंदासाठीं आपण गांवांत साखरा वाटीत सुटूं चला.

चंद्रा—अग तें सर्व खरें. पण ह्या आनंदाचे भरांत आपण अंबाबाईची पूजा करायची अगदीं विसरलों.

पुतळा——त्या मेल्या मोंगलानें आमचा विरस केला.

जानकी——दुःखाचे वेळीं तेवढा देव आठवावा आणि सुखाचे वेळीं त्याला विसरावें हें बरें नाहीं.

येसू—चला आपण पूजा करून अंबाबाईची एकमनानें प्रार्थना करूं या. कां सुभानराव. तुम्ही होता ना सामील या समारंभांत? आतां तरी अंबाबाई जागी झाली आहे ना?

सुभानराव—बायांनों! अंबाबाई तर सदैव जागीच आहे. मी मात्र झोंपी गेलों होतों. तो आतां चांगला जागा झालों आहें. चला आतां आपण सर्व अंबाबाईची प्रार्थना करून गांवांत जाऊं या.

( मुली पूजा करतात व नंतर सर्व जण खालील पद म्हणतात )

पद १० वें ( चाल——प्रणतनाथ रक्षिकांत—तिलककामोद एकताल.)

**प्रणति हीच तव पदांस । दीर्घायू करी शिवास ॥ धृ ॥ अरिशीं रणि लढतांना । विपदा येतिल नाना । परि हरि जननी तयास ॥ १ ॥**

( जातात )

---

## प्रवेश ९ वा.

### स्थळः—किल्ले रायगड.

( जिजाबाई प्रविष्ठ. )

पद ११ वें. ( चालः—नलगे धन राज्य पसारा. )

**जिजाबाई—शिवबा कधिं येईल माझा । मातृ हृदयिंचा गुणिराजा ॥ धृ० ॥ काळ कसा कंठूं मी आतां । हांक मारुनी शिणली माता । देइल कोण तियेल हाता । शंभुबाळ मम मानस–कलिजा ॥१॥**

पाडसावांचून हरिणीला कसें चैन पडेल? माझा शंभुबाळ—भुकेची वेळ झाली म्हणजे, बाळा, तुझा चिमुकला जीव कसा कासाविस होत असे—अलमागिराच्या कैदखान्यांत माझ्या शंभूला वेळेवारीं दोन घांस तरी खायला मिळत असतील कां? आई जगदंबे, माझ्या हातून असा काय अपराध

घडला म्हणून गाय वासरांची अशी ताटातूट केलीस ? माझा शिवबा मला कधीं भेटेल ? [ पडद्यांत—जयजय रघुवीर समर्थ ] अगबाई ! स्वामी आले वाटतें. [ स्वामी येतात व जिजाबाई त्यांना वंदन करतें. ]

स्वामी—जिजाई, काय चाललें आहे हें ? तुमच्यासारख्या विचारवंतांनीं असा अविचार करायचा ? त्या मुलीबाळींना पोटाशीं धरून त्यांच्या डोळ्यांतील अश्रुधारा पुसण्याचें सोडून तुम्हींच अशी रड धरावीत; मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे ! आतां हें रडणें—हें स्वार्थी—रडणें बाजूस ठेवा, आणि उणी उभी दख्खन हवालदील झाली आहे, तिचें आईच्या नात्यानें शांतवन करा. आकाशांत तळपणाऱ्या तेजोमय ज्योतींना—सूर्य चंद्रांनासुद्धां ग्रहदशा चुकत नाहीं मग आम्हां मानवांचा काय पाड ? शिवबासारखीं कार्य कर्तीं माणसें शत्रूच्या कैदखान्यांत खिचपत पडण्यासाठीं जन्मास आलेलीं नसतात खास. आजपर्यंत शिवबावर काय कमीं संकटें आलीं—अगदिं जिवावरचीं होतीं—पण त्यांतूनहि परमेश्वरकृपेनें तो पार पडला कीं नाहीं ? संकटांनींच पुरुषार्थाची परीक्षा होत असते. तुम्ही अगदिं निश्चिंत असा. हरएक प्रयत्न करून दिल्लीश्वराला हुलकावणी देऊन शिवबा तुमच्या समोर, आज नाहीं उद्यां येऊन उभा राहील ही खात्री असूं द्या.

जिजाबाई—समर्थांची वाणी विफल कशी होईल ! मी पुष्कळ विवेक करतें. पण वेडें मन राहत नाहीं. स्वामी, कैदखान्यांत माझ्या शंभु बाळाचे काय हाल होत असतील. आईच्या मांडीवर लोळण्याचें त्याचें वय. ह्या कवळ्या वयांत बंदीवासाचें खडतर जीवन माझ्या बाळाला कसें मानवेल ?

स्वामी—झाली कां पुन्हां शोकाला सुरवात ? तुम्हांला तर काय, शिवाजी संभाजीचीं काळजी. पण त्या जगन्मातेला विश्वाच्या विराट संसाराची चिंता आहे. स्वपुत्राकरवीं महाराष्ट्राला स्वातंत्र्य दान करण्याची जिला स्पृहा, तिनें माया ममतेचे हे पाश झुगारून दिले पाहिजेत. संकटाची सोपान परंपरा चढण्याची तयारी करावी—तेव्हांच वीरमातेच्या पदवीला पोहोंचतां येतें. स्वपुत्राचा विरह क्षणभर सोसवत नव्हता तर मग हें देशसेवेचें बाळकडू कशाला पाजलेंत शिवबाला ? लहानपणीं जर त्याला नीट सरळ शिक्षण दिलें असतें तर आज ह्या घडीला आमचा शिवबा, विजापूर

दरबारचा एक बडा सरदार झाला असता आणि हळुवार मनाच्या ह्या आपल्या आईला त्यानें फुलांपरांच्या गादीवर लोळविलें असतें.

जिजाबाई—स्वामी क्षमा करा. आजपासून ह्या जिजाईनें हें स्वार्थी रडणें सोडून दिलें पहा.

स्वामी—जिजाऊ, संसारांत राहून, संसारापासून अलिप्त राहणें तें हेंच होय. स्वार्थबुद्धि सोडली कीं सुखसंपदा सेवेस सदैव सादर उभ्या राहतात.

समर्थाचिया सेवकां वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ।
जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही । नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥ १ ॥

[ पडद्यांत—जयजय रघुवीर समर्थ. ]

गोसावी—( प्रवेश करीत ) खरोखरीच श्रीसमर्थांच्या सेवकांकडे वक्र-दृष्टीनें पहाण्याची ताकद अखिल भूमंडळीं कोणांतही नाहीं. [ स्वामींचे पाय धरून ] स्वामी—

स्वामी—कल्याण—

जिजाबाई—कोण ?

स्वामी—श्रीसमर्थसद्गुरूंचा शिष्य.

शिवाजी—( जिजाबाईचे पाय धरून ) आईसाहेबांचा—

जिजाबाई—लाडका शिवबा ( त्याला आनंदानें उठवून ) शिवबा किती दिवसांनीं भेटलास ! तुझी सुटका कशी झाली ?

शिवाजी—स्वामी, आईसाहेब, आपले आशीर्वाद पाठीशीं असल्या-वर असल्या अनेक आपत्ती पाठ दाखवून पळून जातील.

स्वामी—शिवबा, साहसी पुरुषालाच विजयश्री माळ घालीत असते.

जिजाबाई—शिवबा तूं आलांस पण माझा शंभुबाळ कोठें आहे ?

संभाजी—( तान्हाजीसह गोसाव्याचे वेषानें प्रवेश करीत व मुजरा करीत हा पहा आलों मी आईसाहेब.

जिजाबाई—( त्याला जवळ घेऊन ) माझें गुणाचें बाळ तें ! किती सुकून गेलें माझ्या राजसाचें तोंड हें ! !

शिवाजी—परमेश्वराची लीला आगाध आहे !

स्वामी—जिजाबाई, अकल्पित भेटीचा आनंद एकट्या आजीनेंच कां लुटावा ? मुलाच्या आईलाही त्यांत भाग घेऊं द्या. जा तान्हाजी, या छोट्या वीराला त्याच्या आईकडे घेऊन जा. पुत्रभेटीचा आनंद अवर्णनीय असतो.

तान्हाजी—जशी आज्ञा. चला बाळराजे येतांना आंत ?

जिजाबाई—जा शंभु, आईला भेटून ये. [ संभाजी तान्हाजीसह जाण्यास निघतो. ]

शिवाजी—शंभु, स्वामींना वंदन केल्याशिवाय जातोस ? दिल्लीस राहून हेंच शिकलास वाटतें ?

[ संभाजी स्वामींना वंदन करून व सर्वांना मुजरे करून तानाजी-सह जातो. ]

स्वामी—शिवबा, मातापुत्रांची भेट म्हणजे जिवाशिवाची गांठ. अरे असल्या ब्रह्मानंदाचे वेळीं मोठमोठ्यांची सावधानता सुटते; हें तर काय अद्याप लेंकरूंच आहे.

जिजाबाई—शिवबा, काढून ठेव आतां हा भगवा पोषाख.

स्वामी—थांब शिवबा, थोडा वेळ हीं भगवीं वस्त्रें अशींच आंगावर राहूं दे. जिजाई, ह्या भगव्या वस्त्रांनीं महाराष्ट्र राजलक्ष्मीचें तेज मलीन होईल अशी शंकासुद्धां मनांत आणूं नका. राजा म्हणजे वैभवविलासांचा धनी नव्हे. भाग्यवशात् हातीं आलेल्या राजपदाची, स्वप्रजाकल्याणार्थ वहिवट करणारा राजा, हा योगीच आहे. पहा जिजाई, कर्मयोगी समर्थरामदास–स्वामींच्या ह्या राजयोगी शिष्याचें हें वैराग्य तेज पहा. [ पडद्यांत—‘महाराज मला वांचवा’ असा शब्द ] ही काय गडबड आहे ?

जिजाबाई—हें काय नवीनच उद्भवलें मधें ? [ शिवाजी जाणार इतक्यांत कासम पळत येऊन त्याच्या पायीं पडतो. ]

कासम—महाराज मला वांचवा.

शिवाजी—कोण कासम ( शिपाई पळत येतात. शिवाजीला पाहून चकित होतात व मुजरे करितात. ) जारे सोडून द्या याला.

एक शिपाई—जशी आज्ञा महाराज ( स्वगत ) महाराज केव्हां आले ? चला ही आनंदाची बातमी गडभर सांगत सुटूं. ( जातो. )

शिवाजी–ऊठ कासम आतां तूं निर्भय झालास. जा आईसाहेबांच्या पायां पड. स्वामींना वंदन कर. ( कासम तसें करतो. )

जिजाबाई—असा हा कोण मनुष्य ?

शिवाजी—आईसाहेब या माणसाचे माझेवर अनंत उपकार झाले आहेत. स्वामी याच्याच कर्तबगारीनें माझी दिल्लीहून सुटका झाली.

कासम—महाराज माझा उगीच बडीजाव करीत आहेत. मी एक आपलें अनाथ लेंकरूं आहें. स्वामी हा कासम—

स्वामी—जातीनें यवन आहे ?

कासम—न'हीं. मी नांवानेंच मुसलमान आहें, आणि यामुळेंच मज-वर मघांचा अनर्थ कोसळला. मी किल्लयाच्या पायथ्याशीं हिंडत असतांना मला पहारेकऱ्यांनीं पकडलें आणि माझ्या मुसक्या बांधून ते मला मारीत सुटले.

जिजाबाई—अशा या परोपकारी मनुष्याची कोणीं अशी दुर्दशा केली ? मला त्याचा जाब विचारलाच पाहिजे.

कासम—नका आईसाहेब त्या गरीबांना शिक्षा करूं नका. त्यांना काय ठाऊक मी रक्ताचा मराठा आहें ?

शिवाजी—आईसाहेब, दिल्लींतील सय्यदुल्लाखान नांवाच्या एका बड्या उमरावानें ह्याला गुलाम म्हणून लहानपणापासून पाळिला. ह्यानेंच मेवामिठाई वांटण्याचा परवाना आपल्या मालकाकडून मला मिळवून दिला. स्वामी, मेवा मिठाई वांटण्याचा क्रम बराच दिवस चालवून एके दिवशीं मिठा-ईच्या करंड्यांतून मी बाळराजांसह कैदखान्यांतून बाहेर पडलों आणि—

स्वामी—' बैराग्याच्या वेषानें निरनिराळ्या मार्गांनीं येथें आलों, ' असेंच कीं नाहीं ?

जिजाबाई—कासमच्या रूपानें प्रत्यक्ष आई अंबाबाईच माझ्या शिवबाच्या मदतीला धांवून आली.

शिवाजी—वाटेंत अनेक संकटें आलीं होतीं, पण त्या जगन्मातेच्या कृपेनें सर्वांतून आम्हीं निभावलों. पण कासम, तुझ्याबरोबर हिरोजी कसा नाहीं आला ?

जिजाबाई—म्हणजे हिरोजीला तूं मागें ठेवून आलास वाटतें ?

शिवाजी—होय आईसाहेब, कैदेंतून पळण्यापूर्वी पांचसात दिवस मीं आजारी असल्याचें ढोंग केलें होतें. मी व शंभु करंड्यांतून कैदेखान्याबाहेर पडल्यावर बऱ्याच वेळानें नित्याप्रमाणें माझ्यासाठीं औषध घेण्यासाठीं म्हणून हिरोजी बाहेर पडणार होता. कासम, हिरोजी नाहीं कां भेटला तुला?

कासम—महाराज, मला तो वाड्यांतच भेटला.

शिवाजी—मग त्याला घेतल्याशिवाय तूं एकटाच कसा निघून आलास?

कासम—महाराज, आपण निघून गेल्यावर, मी वाड्यांत गेलों. तेथें हिरोजी मला भेटला. हिरोजीकडून सर्व बेत कळल्यावर आम्ही दोघे तेथून बाहेर पडण्यास निघालों–पण हा काळतोंड्या—पाषाणहृदयी कासम महाराष्ट्रांत निर्लज्जपणें निघून आला आणि हिरोजी–नका महाराज मला पुढील हकिकत विचारूं नका.

जिजाबाई—कासम, हिरोजी कां बरें मागें राहिला?

शिवाजी—माझ्याच्यानें धीर धरवत नाहीं. सांग कासम पटकन् सांग. माझा हिरोजी कुठें आहे? देवा हिरोजीला उदंड आयुष्य दे.

स्वामी—तथास्तु. शिवबा तुझ्या रूपानें स्वधर्माची सेवा करणाऱ्या धर्मवीराला परमेश्वर उदंड आयुष्य देईल.

कासम—नाहीं स्वामी, तसें आतां होणें नाहीं. महाराज, आम्हीं तेथून निघणार इतक्यांत अलमगीर तेथें आला.

जिजाबाई—अरे देवा!

शिवाजी—आणि पुढें?

कासम—पुढें काय? आपल्याला पळून जाण्यास अवधि सांपडावा म्हणून–महाराज–काय सांगूं मीं–हिरोजी अलमगिराच्या क्रोधाला—

शिवाजी—बळी पडला. कासम खरें कां हें?

कासम—मीं येतच नव्हतों. पण, 'मरणकाळची एवढी तरी इच्छा पुरी कर,' असें कळवळून हिरोजी म्हणाला म्हणूनच मी निष्ठुरतेनें निघून आलों. आईसाहेब हिरोजीनें आपल्याला मुजरा सांगितला आहे. 'मरणाला न भीतां हिरोजी स्वकर्तव्य करीत मेला,' असा निरोप महाराज आपल्याला

निवेदन करण्यास हिरोजीनें मला सांगितलें आहे. स्वामी, अलमगीर इतका दुष्ट आहे कीं, तो हिरोजीला कधींहि जिवंत सोडणार नाहीं.

स्वामी—शाबास रे मर्द मराठा.

जिजाबाई— बाळा हिरोजी, काय तुझी ही अलौलिक स्वामीनिष्ठा ?

कासम—आईसाहेब असलीं स्वार्थत्यागीं माणसें–धन्याकरितां देह ठेवणारीं माणसें हिंदुपद्पादशाही स्थापण्यासाठीं झगडत आहेत—

शिवाजी—आणि हा त्यांचा निर्लज्ज धनी, त्यांना खुशाल काळ-मुखांत बिनादिक्कत लोटून देत आहे. धिःक्कार असो अशा धनीपणाला.

स्वामी—शिवबा कां उगाच आत्मनिंदा करीत आहेस ? हिरोजीचें कधींहि वाईट व्हावयाचें नाहीं—

जिजाबाई—देशाकरितां देह ठेवणाऱ्या वीराचें कां वाईट होईल.

शिवाजी—हिरोजी, तुझ्यासारख्या स्वार्थत्यागी देशसेवकाला स्वर्गाच्या द्वाराशीं सामोरें येण्यासाठीं देवांच्या दरबारांत कोण गर्दी उडाली असेल !

कासम—महाराज आपल्यासारखे पोशिंदे पाठीशीं असल्यावर कोणा स्वामीनिष्ठांना असला आत्मयज्ञ करावासा वाटणार नाहीं ?

शिवाजी—माझ्या हिरोजीचा हा आत्मयज्ञ पाहून स्वर्गीचे देवसुद्धां आनंदानें अश्रु ढाळत असतील. पण स्वामीनिष्ठ सेवकाचा बळी देऊन स्वतःच्या प्राणलोभानें दिल्लीहून पळून येणारा हा आपला पुत्र पाहून, आईसाहेब, स्वर्गसुखांतही बाबांनीं लाजेनें मान खालीं घातली असेल.

जिजाबाई—शिवबा,

स्वामी—लाख मारावेत पण लाखांचा पोशिंदा मरूं नये.

शिवाजी—हिरोजी, हिरोजी केवढें तुझें साहस हें ! आईसाहेब, माझा हिरोजी मला टाकून कसा गेला ? हिरोजी—

हिरोजी—( प्रवेश करून ) महाराज, [ सर्वांना मुजरा करतो.

शिवाजी—कोण हिरोजी ? [ शिवाजी त्यास कडकडून भेटतो.

जिजाबाई—माझा हिरुबाळ ?

स्वामी—महाराष्ट्राचा रणमर्द मावळा ?

कासम—शिवाजी महाराजांचा शूर शिपाई ?

हिरोजी—स्वामी, आईसाहेब, महाराज होय मीच तो सर्वांचा दास. तुमचा हिरोजी फर्जंद.

शिवाजी—मला वाटलें हिरोजीला आमचा कंटाळा आला—

हिरोजी—महाराज, जीव गेला तरी हिरोजीला या पायांचा मोह सुटणार नाहीं इतकी अगणित पुण्याई आहे या पायांची. (शिवाजीचे पायाशीं बसतो.)

शिवाजी—(त्याला प्रेमानें उठवून) हिरोजी तुमच्यासारख्या जिगरदोस्तांच्या बळावर तर आमच्या ह्या साऱ्या उड्या. तुमच्या माझ्यावरील प्रेमामुळेंच तुम्हांला माझे ठायीं नसते सद्गुण दिसतात.

हिरोजी—नाहीं महाराज, आपली योग्यता फार मोठी आहे. रामनामावर दगड तरल्याची कथा लहानपणीं ऐकतांना मी बुचकळ्यांत पडत असे. पण शिवाजीमहाराजांच्या देवतुल्यनामबलावर दिल्लीश्वराच्या क्रोधसमुद्रांत बुडत असणारा हा दगड तरलेला पाहून त्या पुराणकथेची प्रचीती मला आली.

कासम:—हिरोजीराव, अलमगीरानें तुम्हांला जिवंत सोडलें हें आश्चर्य आहे!

जिजाबाई:—अग्नीनें आपली दाहकता सोडण्याइतकेंच हें नवल आहे.

हिरोजी:—यांत आश्चर्य तें कसलें? महाराज कसाही झाला तरी अलमगीर गुणग्राही वीर आहे. आणि म्हणूनच हा असंभाव्य प्रकार घडून आला.

स्वामी:—हिरोजीराव, तो जगत्पिता आपल्या आवडत्या भक्तांकरवीं असल्या अगम्य लीला इतरेजनांना दाखवीत असतो.

शिवाजी:—त्या दयाघन प्रभूचे आम्हांवर अनन्य उपकार आहेत. हा आनंदाचा दिवस त्याच्याच अनुग्रहानें आपल्यास दिसला.

कासम:—महाराज, आपण धर्मसंस्थापक आहांत. या पोरक्या पोराला आपल्या धर्मछत्राखालीं घ्या, म्हणजे आज आनंदाचा कळस होईल. [शिवाजी तटस्थ.]

स्वामी:—शिवबा, आमची पूर्ण सहानुभूति आहे या कार्याला. ह्या

गोष्टी आतां झाल्याच पाहिजेत. वाट चुकून, भलतीकडे गेलेला स्वधर्मबंधु पुन्हां दाराशीं आला तर त्याला घरांत घ्यायला नको का ?

निजाबाई:—माझ्या शिवबाच्या सुटकेला कारणीभूत झालेल्या ह्या उपकारी लेंकराला मी कधींही दूर लोटणार नाहीं.

स्वामी:—शिवबा, तुमच्या सारख्या लोकनायकांच्या वर्तनावर बहुजन समाजाचें भवितव्य अवलंबून असतें. स्वतःच्या सदाचरणानें स्वजनांचा जीवनप्रवाह इष्ट कार्याकडे वळवून घेणें ह्यांतच जीविताचें साफल्य आहे. अंतरीची कळकळ आचरणांत उतरविल्याशिवाय आंगीं लोकनायकत्व येत नाहीं. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे. 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा' ॥ हे श्रीसमर्थसद्गुरूंचे बोल ध्यानीं धरून वागणें हेंच तुम्हां वीर पुरुषांचें व्रत. ज्यांच्या वंशांत आपण जन्मलों, त्यांचें नांव गाजविल्याशिवाय पितृऋण फिटत नाहीं.

शिवाजी:—स्वामी,

पद १२ वें. [ बाळगुणाचा टाकुनि गेला—या चालीवर ] भैरवी

देशहिताला वाहिली काया । वाहिली काया । सोडुनि माया । सोडुनि माया वाहिली काया ॥ धृ० ॥ परमपूज्य ही मायभूमि मम । लाविन जगता तद्गुण गाया ॥ १ ॥ आशीर्वचबळ मजला मिळतां । घालिन प्रेमें स्वराज्यपाया ॥ २ ॥

[ शिवाजीचें पद होत असतांनाच तान्हाजी संभाजी येतात. ]

( पद झाल्यावर ) त्या जगत्सूत्रधारानें आजपर्यंतचें हें अल्प स्वल्प कार्य मज करवीं घडवून आणलें आहे. तेंच कार्य आपणां सर्वांच्या पुण्यबळावरच पुढें अव्याहतपणें चालविण्याचा संकल्प या मंगलक्षणीं हा शिवाजी करीत आहे.

स्वामी—सत्य संकल्पाचा दाता तो नारायण तुम्हां सर्वांचें मनोरथ पूर्ण करो. हिरोजी, तान्हाजी, दिल्लीश्वराचे पिंजऱ्यांत दैवयोगें अडकलेला हा शिवनेरचा सिंह कर्मयोगें सुटला आहे. आपल्या कंठरवानें तो केसरी आतां हें सारें निद्रिस्त रान खडबडून जागें केल्याविना राहणार नाहीं. भ्याडभेकांची आरडाओरड थांबेल. कर्मनष्टांची कोल्हेकुई बंद पडेल आणि ह्या आमच्या महाराष्ट्राचें लवकरच आनंदवनभुवन होईल.

शिवाजी—शुभ घडीच्या ह्या सुमुहूर्तावर या पतित पोराला भवानीच्या साक्षीनें पावन करून घेऊन, स्वामी, धर्मसंस्थापनेच्या कार्याची मुहूर्तमेढ रोंवण्याची आज्ञा मला द्या.

स्वामी—तथास्तु.

पद १३ वें ( चाल—मै तो दासी बनी. ) भैरवी.

घेई धांव झणी । नुरला सदयचि कोणी ॥ धृ० ॥ दीनासमही परवश आतां, झाली भारतमाता । हात तिला जरि देशि न सदया बुडेल बघतां बघतां ॥ १॥ श्री सरस्वति गेल्या उठुनि येथुनि वैतागोनी । लवकरी भरो मनीं तयांच्या ही आर्यांची जननी ॥ २ ॥

सर्वजण—पद १४ वें. ( चाल— भास मला जाहला )

एकमनें करुंया जी मायभूमिसेवा । निश्चयो मनींचा विफल न कधिं व्हावा । मंगलार्थ शिवकुमार भावें भजावा, स्मरावा ॥ धृ० ॥ तळपो कांचनकिरणीं । स्वातंत्र्याचा ताणी । हीच हांव, पुरवि; धांव, देवा, दयेचा तूं ठेवा ॥ १ ॥ अधर्म स्वार्थ दुरि करोनि । मायाममता त्यजोनि । मुक्तदेश, करुनि; देह सौख्यें पडावा, झिजावा ॥ २ ॥

—श्रीकृष्णार्पणमस्तु—

श्री

# महाराष्ट्राचें पावनतीर्थ.

लें०:—एन्. डी. सरपोतदार, सिनेमा आर्टिस्ट.

## प्रवेश १ ला.

**स्थळ:**—जंगलांतील छावणी.

पात्रें:—औरंगजेब व तखरीफखान.

---

औरंगजेब—काय म्हणतां ? आपलें सैन्य सर्वत्र मार खातें आहे? कोठें ही जय नाहीं ?

तखरीफखान—जय नाहीं असें नाहीं. सुरवातीला तो जय वाटतो, पण लगेच पराभवाची बातमी ऐकावयास येते.

औरंगजेब—म्हणजे ? याचा अर्थ काय ?

तखरीफखान—आमचें धोरण चढाईचें तर मराठ्यांचें निवळ बचावाचें. आम्ही एका बाजूनें प्रांत घेत जावें, तर लगेच मराठ्यांनीं ते मागून येऊन हिसकाऊन घ्यावेत. प्रत्यक्ष लढाईला ते पहाडके चूहे कधींच तोंड देत नाहींत. त्यामुळें बादशाही सैन्य खलास होत आहे, आणि त्यांचा मात्र नुसता लपंडावाचा खेळ चालला आहे. आमच्या समोर ते मैदानांत उभे राहतील तर त्या मराठ्यांचे आम्ही नुसते चुरमुरे भाजूं.

औरंगजेब—यंव करेंगा, और त्यंव् करेंगा, असा तुमचा बकवाच मोठा. तुम्हांला लाज वाटली पाहिजे. काबूल कंदहारपासून हिंदुस्थानांत सर्वत्र विजयी असलेलें सम्राट सैन्य, चिटभर मराठ्यांच्या मूठभर जमातीनें नामोहरम् करावें; आणि तुमच्यासारख्या बादशाही सरदारानें त्याचें माझ्यापुढें रडगाणें गावें. धिक्कार असो तुमच्या शिपाईगिरीला. छपन्न सरदार दोन शहाजादे, आणि खुद्द बादशहा, चार लाख सैन्यासह दक्षिणेंत मरा-

त्यांशीं झुंजतों आहे. तरी पण जमिनीचा वितभर तुकडा कीं, लुटीची एक अकबरी अजून बादशाही खजिन्यांत जमा नाहीं! शत्रूंच्या मुलखांत पदरचें खाऊन राहण्याची पाळी आज तागाईत या मोंगल सैन्यावर कधीं आली नव्हती. ती ह्या संभ्यानें, ह्या कर्दनकाळानें औरंगजेबावर आणावी ? अफसोस ! अफसोस ! मी समजलों मराठ्यांचा प्राण, तो शिवाजी संपला कीं, बाकी राहिलेल्या मराठ्यांचे आपोआप मुडदे पडून, मोंगलाचें सैन्य बिनघोर ह्यांच्या मुलुखांत घुसून त्यांच्या देवळावर 'चांद तारा' फडकवील; पण ह्या संभ्यानें उलटा अनुभव आणिला.

तखरीफखान—हे सैतान मराठे केव्हां काय करतील याचा कोणीही भरंवसा धरूं नये. हा मराठ्यांचा आजचा छत्रपती संभाजी आपल्या बापाजवळ भांडून आपल्या जवळ नौकरी मागण्याकरितां आला होता, त्यावेळीं किती गरीब अल्लाची गाय दिसत होता, पण आतां—

औरंगजेब—( विचार करून ) देखो, तखरीफखान मी मघापासून विचार करतों आहे कीं, हा संभाजी अविचारी, नादान, दारुबाज असा सर्वत्र ह्याचा दुर्लौकिक आपण ऐकत असतां, हा माझ्या सारख्या प्रबळ शत्रूला जर्जर कसा करितो ? त्याला एवढ्या ऐशारामांतून, स्वारी शिकारीला वेळ कसा मिळतो ? आणि तोही एकाच वेळीं ! मी मुद्दाम उठाविलेले फिरंगे—टोपीवाले—सिद्दी या सगळ्यांना तोंड देऊन घरांतल्या अष्टप्रधानांना जागच्या जागीं दाबून, भाऊबंदांना पुरून, पुन्हां आपल्या बरोबर झुंजण्यास कसा तयार असतो ? तो खरोखरच व्यसनी आणि जुलमी आहे, असें म्हणावें, तर त्याची हुकमत शिवाजीच्या तेजस्वी मराठ्यांवर कशी चालते ? त्याचा एकही सरदार—सैनिक—किल्लेदार, आपल्याला फितूर कसा होत नाहीं? मला तर त्याच्या विषयींच्या कंड्या सर्व झूट वाटतात. असें करण्यांत मराठ्यांचा आपल्याला फसविण्याचा कांहीं कावा असला पाहिजे. किंवा कंड्या उठाविणारांचा संभाजीशीं काहीं दुष्मन् दावा तरी असला पाहिजे—

तखरीफखान—हुजूरचें म्हणणें मलाही अगदीं बरोबर वाटतें. शहाजादे परवां सांगत होते कीं, शिपाईगिरींत तो शिवाजीसे जादा बलके सवाई सर्जा आहे. तसेंच घरांतल्या भांडणाचा डोक्याला त्रास होऊं नये म्हणून तो कधीं कधीं शराबही पितो. पण त्याचा अर्थ तो रात्रंदिवस शरा-

बांतच मषगुल असतो असा मात्र मुळींच नाहीं. त्याप्रमाणें त्यानें कांहीं लोकांना कडक शिक्षा केल्या पण त्या कोणाला ? जे त्याच्याच जिवावर उठले आणि ज्यांनीं त्याला गादीवर न बसविण्याची खटपट केली त्यांनाच.

औरंगजेब—अगदीं बरोबर ? त्याचें असेंच झालें असलें पाहिजे. जर तो जुलमी अविचारी म्हणावा, तर त्यानें आपल्या भावाला कसें अद्याप ठार मारलें नाहीं. त्याच्या तर जीवावर सरदार मंडळींनीं एवढा कट केला.

तखरीफखान—हां—मी सुद्धां तेंच म्हणतों.

औरंगजेब—( कांहीं वेळ विचार करून ) एकंदरींत संभाजी विषयींचा आपला अदमास सफशेल फसला. मला असें वांटू लागलें आहे कीं मोंगलांच्या अनिरुद्ध सम्राट सत्तेच्या वाढत्या मार्गांत मराठेशाही ही एक प्रचंड आणि अभंग अशी धोंड पडली असून, आमच्या आजच्या लष्करी हालचालींना सुद्धां अभेद्य आहे.

तखरीफखान—ज्यांनीं उत्तरेंतील रजपूत–जाठ–शीख–बुंदेले–पठाण असे जोमदार आणि अजिंक्य योद्धे आपल्या समशेरीच्या एकाच फटकाऱ्यानें जागच्या जागीं निजविले, त्यांना हे डोंगरातले उंदीर मरगठे चिरडावयास कितीसा उशीर ?

औरंगजेब—( किंचित स्मित करून ) खानसाहेब ! मराठ्यांच्या बाबतींत आपला समज चुकीचा आहे. आपण सांगितले ते योद्धे शूर खरे, शेर खरे पण तीं नुसतीं जनावरें होतीं. त्यांची युक्तीनें शिकार करणें मनुष्याच्या मेंदूला फारसें अवघड नव्हतें. पण हे शिवाजींचे मराठे म्हणजे समशेर के शेर और मगजके सवा शेर है.

तखरीफखान—( हंसून ) कोणीही, कितीही व कसाही प्रबळ असला तरी शहानशहाको वो बच्चेके माफक है.

औरंगजेब—सरदार साहेब, मला तर असें वाटतें कीं, ही मराठेशाही बुडवावयास मोंगली समशेरीपेक्षां मराठ्यांतलाच एकादा फितूर झाल्यास बरें; आणि तसें झालें तरच ही दखनची स्वारी फत्ते होईल.

## प्रवेश २ रा.

**स्थळ:—रस्ता, पात्रें:—दौलती व दाऊद.**

( दोघेही बोलत प्रवेश करितात. )

दाऊद—( दौलतीच्या खांद्यावर हात ठेऊन ) देखो यार दौलती, तुम हमारा जानीदोस्त, इसवास्ते कहता हूं की तुम आपनी जिंदगी और जान बचाने के लिये मुसलमीन बन जाव. बोलो अलमगीर की फत्ते, अल्ला हो अकबर !

दौलती—( एकदम चिडून ) क्या मैं मुसलमीन बनूं. हमारी हिंदुपद बादशाही अजून संपली नाहीं.

दाऊद—तेरेकूं क्या मालूम आदिलशाही कुतबशाही जैसी कत्तल हो गयी वैसी तुमारी हिंदुपदबादशाही भी—

दौलती—तुमलेकु क्या मालुम रे हम मराठे लोक मरेंगा पण हरेंगा नही. हमारी हिंदुपदबादशाही धुतली तरी पुसावयाची नाहीं. समजलास ?

दाऊद—हम इस्लामी भी कटेंगा तोभी हरेगा नहीं. ( एकदम सुरा काढून ) अब बोल मुसलमीन होता है, या नहीं.

दौलती—( घाबरून ) अरे वारे दोस्तीच्या पोटीं अशी दगाबाजी. ( दाऊद पुन्हां सुरा दाखवीत आहे असें पाहून गर्भगळीत होऊन, स्वगत ) क्या करना नंगेको खुदा डरता है ( उघड ) मुसलमान बनता हूं, शेंडी काटके दाढीकूं लावतां हूं. ( दत्ताजी प्रवेश करितो व दौलती डोळे मिटून बडबडतो. ) तुम तुमारा सुरा पाठी मागे घे. मी मुसलमान होता हूं.

दत्ताजी—( एकदम त्याचे अंगावर जातो ) ए बेवकूब, हैवानका बच्चा, जिवाच्या आशेनें हिंदूचा मुसलमान होतोस ! हें छत्रपतींचें राज्य आहे तुला ठाऊक नाहीं ? पुन्हां असें म्हणालास, तर तुझा खेमा करून कोल्ह्याकुत्र्यांना खावयास घालीन. याद राख. दोस्त म्हणून आतांची वेळ सोडतों.

दौलती—( डोळे उघडून ) हे कोण ! दुसरे दोस्त आमच्या जिवावर उठले. ( स्वगत ) आज आमच्या दोस्तांचा घातवार दिसतो. गुलाम लढाईंत मरायचें सोडून माझा जीव घ्यायला कशाला येतात. सुळीं जाऊन

मरायला ? ( उघड त्याच्याकडे पहात उठून ) का दत्ताजीबुवा मघाशीं तो दाऊद मला मारायला आला होता त्यावेळीं कुठे गेला होतास, मसणांत ? मी रे कशाला मुसलमान हूं. माती मोलानीं मरण्यापेक्षां मुसलमान होऊन मानकरी झालेले बरें म्हणून मी त्यावेळीं डोळे मिटून कबूल केलें पण आतां मला तुझा धीर आला. ( दुसऱ्या बाजूस पहात हात वर करून ) येऊं दे आतां कोणताही मुसलमान बाबू. सुरा तरवार—बंदूक नव्हे तोफ घेऊन येऊं दे ( इतक्यांत दत्ताजी जातो व दाऊद प्रवेश करितो. ) एकाच ठोशानें देतों त्याला अल्लाच्या दरबारांत पाठवून. (इतक्यांत दाऊदवर नजर जाते व दचकून घाबरून खालीं पडतो. ) या अल्ला, खुदा रहिमान, भिसमिल्ला, राम रहीम, जोतीबा, खंडोबा, जय आई, भवानी, ( दाऊद हंसत जातो. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थळ:—दिवाणखाना. पात्रें—जोत्याजी व संभाजी.

( बोलत बसले आहेत. )

जोत्याजी—सरकार आपण ह्या कनोजी ब्राम्हणावर इतका विश्वास टाकूं नये. किती झाला तरी तो परदेशी.

संभाजी—( रागानें ) तुम्ही स्वदेशी होतां, जातीचे होतां, मराठी मनसदीचे पिढिजाद नौकर होतां मग कां तुम्ही माझ्याविरुद्ध बंड केलेंत. कां तुम्ही माझ्या जिवावर उठलांत? मला गादी मिळूं नये अशी प्रधान मंडळाची आणि सोयराबाईची कां इच्छा ? आबासाहेबांचा मी कां औरस नव्हे. राजारामच तेवढा औरस ?

जोत्याजी—सरकार. असें कसें म्हणतां येईल ?

संभाजी—मग तुमच्यावर विश्वास ठेऊन तुम्ही काय माझें भलें केलेंत? घरचा विश्वास उडाल्यावर बाहेरच्यांवर विश्वास ठेवूं नये तर काय करावें ?

जोत्याजी—प्रधान मंडळांतला एकादा दुसरा मंत्री आपल्या विरुद्ध असला म्हणून सर्व मराठेशाही आपल्या विरुद्ध नाहीं. तसें असतें तर आपल्याला ही गादी इतकी सहज प्राप्त झाली नसती. बरें, सरकार आपण गादीवर आल्यानंतर आपल्याविरुद्ध पुन्हां कधीं बंड झालें आहे काय ?

एकातरी मराठ्यानें आपण छत्रपती नको म्हणून आपली नापसंती दाखविली आहे काय ? इतक्या दिवस शत्रू आपल्या मुलखांत वावरतो आहे, पण एक तरी मराठा त्याला फितुर झाला काय ? उलट आपल्यासारखे छत्रपती ह्या आणीबाणीच्या काळाला लाभले म्हणून प्रत्येक मराठा चढाओढीनें आपल्या हुकमतीसाठीं प्राण देण्यास हांसत पुढें येतो आहे.

संभाजी—( डोळ्यांत आसवें आणून ) जोतीबा, मराठ्यांचें हें ऋण मी कधींही विसरणार नाहीं. मी त्यांची कामगिरी जाणून आहे. मराठ्यांनीं जिवाचें मोल देऊन जगविलेली ही मराठेशाही मराठ्यांचीच "दिल दौलत" आहे. संभाजीची नाहीं हें मी कधींही विसरणार नाहीं. एवढेंच केवळ नव्हें तर, छत्रपतीवर झालेल्या या ऋणाकरितां हा संभाजी मराठेशाहीसाटीं आपल्या जिवाचें कुरबान करील.

जोत्याजी—राजाला विष्णूचा अवतार म्हणतात आज मी ही देववाणीच ऐकली म्हणावयाची. सरकार, मराठेच केवळ नव्हेत तर दुष्मन दुनिया सुद्धां आपणांला शिवसिंहाचा छावा, म्हणतात तें उगाच नाहीं.

संभाजी—जोतीबा मराठे मंडळाला माझी खात्री द्या. एकवेळ संभाजी कलुषाचा अंकित झाला, तरी छत्रपतीचे शिक्का मोर्तब आणि मराठेशाहीचें हित अनहित मराठ्यांच्याच ताब्यांत राहील. कलुषा संभाजीचा दिवाण आहे, छत्रपतीचा नाहीं.

जोत्याजी—सरकारांना आपल्या प्राणाची पर्वा नसली तरी प्रत्येक मराठ्याला तो आपल्याच प्राणाइतका प्रिय आहे. छत्रपती हा मराठ्यांचा प्राण आहे तो आम्ही त्या चोरांच्या हातांत कसा जाऊं देऊं !

संभाजी—मी सुद्धां त्याला गळ्यांत हात टाकूं दिला तरी गळ्यावर हात ठेऊं देणार नाहीं, याची खात्री बाळगा. छत्रपतीच्या प्राणावर मराठ्यांचा वारसा आहे हें मी कोणत्याही स्थितींत विसरणें शक्य नाहीं.

जोत्याजी—( संभाजीच्या पायावर डोकें ठेऊन ) अशा छत्रपतीला भवानी उदंड आयुष्य देवो !

---

## प्रवेश ४ था.

**स्थळः—रस्ता. पात्रें दाऊद व दौलती.**

दौलती—( डोकें खाजवीत स्वगत ) काय करावें. मोठी आणिबाणीची वेळ गुदरली आहे. हिंदुपदबादशाही टिकणार कां मोंगलाई होणार; राम म्हणावयाचें कीं रहीम म्हणावयाचें; शेंडी ठेवावयाची कीं दाढी वाढवावयाची; अशी केसांची अदलाबदल करूनच जर धर्मांतर होत असेल तर नारळ हिंदू आणि बोकड मुसलमान समजला पाहिजे. पण तसें म्हणावें तर हिंदू आपल्या पवित्र कार्यांत अगोदर नारळ फोडतात आणि मुसलमान बकरी ईदला प्रथम बोकड तोडतात. एक म्हणतो वाजवा तर दुसरा म्हणतो बंद करा. काय गंमत आहे या धर्मांची. ( इतक्यांत पडद्यांत पैगंबर की फत्ते अलमगीरकी फत्ते. अल्लाहो अकबर घाबरतो. ) अरे बापरे मुसलमानांचा जय झाला वाटतें; ( शेंडी उपटूं लागतो इतक्यांत पडद्यांत छत्रपति संभाजीमहाराज की जय. जय भवानी. जय जय रघुवीर समर्थ ! ! घाबरतो. ) आतां हिंदूंचा जय ? काय करावें बुवा आपल्यासारख्या पोटभरू गरिबांनीं ! वास्तवीक मला कोणत्याही धर्माचा काडीचाही अभिमान नाहीं. असणार कसा ? कोणता धर्म आमच्या पोटाची हमी घेतो आहे ? एकही भिकारी नाहीं असा कोणता धर्म आहे ? मग ज्या धर्मांत पोट भरत नाहीं मग तो धर्म कसला. मीं तर ठरविलें आहें—( इतक्यांत दाऊद येतो व सुरा उगारून )

दाऊद—तूं काय ठरविलें आहेस ?

दौलती—( घाबरून ) मुसलमान होण्याचें.

दाऊद—मग आण इकडे शेंडी ( लगेच सुरीनें त्याची शेंडी कापतो ) व जातो ( इतक्यांत दत्ताजी हातांत भाला घेऊन येतो व त्याजवर रोखून. )

दत्ताजी–खबरदार मुसलमान झालास तर,उचल ती शेंडी ठेव डोक्यावर. ( दौलती तसें करतो व दत्ताजी जातो व दाऊद येतो व पूर्ववत त्याला सुरा दाखवितो. )

दाऊद—क्या तुम फिर हिंदू बन गये ! ( दौलती घाबरतो व शेंडी काढून दाढीला लावतो दाऊद जातो. ) पुन्हा दत्ताजी येतो व भाला दाखवितो, दौलती पुन्हां दाढी काढून शेंडीच्या ठिकाणीं लावतो. शेवटीं

त्रासून ) परमेश्वरा ( इतक्यांत दाऊद दिसतो. ) पैगंबरा तुम हमकूं (दत्ताजी दिसतो ) बायको कां नाहीं केलेस ? म्हणजे कोणत्याही धर्मांत निदान शारीरिक फेर बदल करावयाला नको होता.

---

## प्रवेश ५ वा.

**स्थळः—जंगल. पात्रें:—कलुषा व तखरीफखान.**

तखरीफखान--( इकडे तिकडे पाहात कलुषाचे कानांत सांगतो. ) समजा, दोस्तीच्या दंगलींत संभाजीनें तुम्हाला अगदीं पंचवीस लाखांची जहागिरी दिली तरी त्याच्या पश्चात तुम्हाला पचूं देणें सर्वस्वीं मराठ्यांच्या हातांत आहे. हे मिस्किल मराठे उत्पन्नाचा एक घांस तुमच्या पोटांत जाऊं देणार नाहींत. मग तुम्हांला या गोष्टीचा पश्चात्ताप होईल. पण त्यावेळीं तो काय उपयोगाचा ! पाऊस गेला आणि पेरणी केली अशीं तऱ्हा व्हावयाची !

कलुषा—खानसाहेब तुम्ही म्हणतां त्या सर्व गोष्टी मला पटतात.पण हा राष्ट्रघात–धर्मघात आणि स्वामीघात आहे. ह्या अघोर कृत्याला माझ्यासारख्या सुविद्य ब्राह्मणानें तयार होणें...

तखरीफखान—अगदीं फायद्याचें आहे. सात जन्मांची संपत्ती मिळवावयाची असेल तर असेंच अघोर आणि अचाट काम करावयाला पाहिजे. राजलक्ष्मी कधीं शेंदाड शास्त्र्यावर प्रसन्न होत नाहीं. तिला सैतानाची नीती आणि राक्षसाचें काळीज असावें लागतें.

कलुषा—पण सरदारसाहेब, दुर्दैवानें तें माझ्याजवळ नाहीं.

तखरीफखान—मग संभाजी बरोबर तुम्ही कुत्र्याच्या मोतीनें मगायला तयार व्हा. आणि आजच तुझ्या अबलादिला मथुरेला पाठीव. तेरे पितर सरग भयो करावयाला.

कलुषा—खानसाहेब आपलें म्हणणें माझ्या वर्मी लागतें, पण—

तखरीफखान—( हंसून ) काय कविराज, आपण पण, पण काय करीत बसलांत.जसें कांहीं आपण सबंध आयुष्यांत पाप केलेंच नाहीं असा आव आणतां आहांत. अहो, पण आम्ही तुम्हांला चांगलें ओळखतों. आज आपण दक्षिणेंत येऊन संभाजीचे दिवाण झालांत. पण पूर्वीं कोण होतात.

मथुरेचा चोबा हा शाक्तपंथी कवीकुलेश ( त्याबरोबर कलुषा चपापून त्याचेकडे पाहातो ) जादू मंतर छू !

कलुषा—( घाबरून त्याचेकडे पहात ) काय सरदारसाहेब हें ?

तखरीफखान—अहो तुम्हा शाक्तपंथी अघोरकर्म्यांना नरबळी म्हणजे हातचा मळ. ( इतक्यांत कलुषा हळूंच त्याचे कानांत कांहीं बोलूं लागतो. तखरीफखान हंसतो.) त्याबद्दल मी हमी घेतों. आपण ही कामगिरी करा की लगेंच आपल्या हातांत मथुरेची पंचवीस लाखांची जहागिरी. ( खान हंसत ) तुमच्या पुढच्या पंचवीस पिढ्यांना, हातांत दर्भ घ्यायला नकोत ! आहांत कोठें तम्ही ! पुन्हां मराठ्यांचा तिकडे मोंगली मुलखाशी कांहीं संबंध नाहीं. ( इतक्यांत कलुषा त्याचे हातावर टाळी देतो. )

---

### प्रवेश ६ वा.

स्थळ—दिवाणखाना, पात्रें—जोतीबा व खंडो बल्लाळ.

जोतीबा—छत्रपतीच्या जिवाला जीव देणाऱ्या मराठ्यांच्या संगीन पहाऱ्यांतून—रायगडासारख्या ह्या अभेद्य दुर्गांतून हा कलुषा सरकारांना बाहेर काढण्याच्या विचारांत दिसला. कालच त्यानें शिकारीच्या निमित्तानें सरकारांना संगमेश्वराकडे चलण्यास सुचविलें आहे.

खंडोबा—कां ? शिकारच करायची तर आजूबाजूच्या मावळी प्रदेशांत कोठेंच करतां येत नाहीं? त्याला संगमेश्वरासारखा अडचणीचा आणि दूरचा प्रदेश कशाला पाहिजे ?

जोतीबा—पण हें सांगायचें कोणी सरकारांना. होऊन गेलेल्या सोयराबाईच्या कारस्थानामुळें मराठे मंडळांतील कोणाचीही सूचना त्यांना संशयास्पद वाटते. आपली धोक्याची सूचना सरकार स्वारींना नेहमी विश्रांतीची जागा वाटते, आणि हुजुरांच्या ह्या मनः स्थितीचा तो चोर कलुषा हवा तसा फायदा घेतो. चिटणीस कांहीं कांहीं वेळेला माझें रक्त असें कांहीं उसळूं लागतें कीं,—

खंडोबा—हां शांत व्हा ! जोतीबा, राग येणें स्वभावधर्म आहे. पण भडकलेला राग जाणून बुजून शांत करणें अमोल राजकारण आहे. जगप्रसिद्ध शूर वीरांना राग वेळींच आवरतां न आल्यामुळें क्षुल्लक माणसाच्या

हातूनही मरावें लागलें आहे,हें लक्षांत आणा. योद्ध्याचें डोकें क्रोधानें काबीज केल्यावर ते शत्रूला सहज धडापासून वेगळें करतां येतें. आपल्याला वाटतें त्याप्रमाणें प्रत्येक मराठ्याला वाटतें कीं, या कलुषाचा कांटा--( कांहीं तरी चाहूल लागल्यामुळें इकडे तिकडे पाहातो. )

जोतीबा--छे. इकडे-ह्या बाजूला-कोण कशाला येईल ? (इतक्यांत कलुषा डोकावतो. )

खंडोबा--पण महादेवाच्या पिंडीवरचा तो विंचू ठेचणें अवघड आणि अशक्य होऊन बसलें आहे. पैजारानें मारावा तर दैवत भ्रष्ट होतें, आणि गय करून स्वस्थ बसावें तर पुजाऱ्याला डंक मारतो.

जोतीबा--कांहीं हरकत नाहीं. डंक मारला तरी मी छत्रपतींच्या पायाचा पुजारी आहे. मी एकदां तरी जवळ जाऊन त्याची नांगी उपटणार ! चालू राज कारणावर--

खंडोबा--ह्याचा परिणाम किती भयंकर होईल याची तुम्हांला कल्पना तरी आहे काय ?

जोतीबा--काय होणार आहे. फार झालें तर छत्रपती मला ठार मारतील ! वाटल्यास आपल्या पक्षाची आणखी चार मंडळी जातील. पण त्यामुळें दीन दुनिया तरी सुखी होईल ! महाराष्ट्र सूर्याचें हें खग्रास ग्रहण तरी सुटेल.

खंडोबा--पण त्याचा अनिष्ट परिणाम म्हणजे छत्रपतींचें मोंगलांच्या स्वारीवर वेधलेलें मन पुन्हां भाऊबंदकींत पडून शत्रूला मात्र घरांत घुसायला चांगली फुरसद होईल.

जोतीबा--खंडोबा साप चावून त्याचें विष चढूं लागलें तरी त्याला,

खंडोबा--तूर्त दंशावर उपाय करावयचा व मग सापाचा सूड घ्यायचा. ह्या सैतानांच्या सहवासांत सरकारांचा जीव धोक्यांत आहे हें जाणूनच जिवापलीकडे त्यांचें संरक्षण करायचें, पण त्याची शत्रूला कीं सरकारला चाहूल लागूं द्यायची नाहीं.आणि अशा रितीनें कलुषाचा कावा सरकारांच्या एकदां लक्षांत आल्यावर मग त्यांच्याच हुकुमानें त्याचें शीर उडवायाचें हा एकच उपाय उरला आहे.

( दोघेही जातात )

कलुषा—( स्वगत ) कालिकेच्या मनांतून आपल्याच भक्ताला यश द्यायचें होतें म्हणूनच ह्या मराठ्यांच्या भवानी भक्तांचा डाव मला कळला. बरें आहे म्हणावें, मराठ्यांनो हा कनोजी कलुषा दुसऱ्याच एकाद्या डावानें तुम्हांला कसें चकीत करतो पहा. ( जातो. )

---

## प्रवेश ७ वा.

**स्थळः**—जंगल. पात्रें—संभाजी, कलुषा, तखरीफखान व शिपाई आणि शिकारी.

संभाजी—शत्रूपासून प्रजेचें संरक्षण करणें हें जसें राजाचें कर्तव्य आहे, त्याप्रमाणें क्रूर श्वापदांपासून त्यांच्या जनावरांचें व त्याचें संरक्षण करणें हेंहि राजाचें कर्तव्य आहे.

कलुषा—( जागा दाखवीत ) सरकार तो पिसाळलेला वाघ ह्याच रानांत राहातो म्हणतात. ती पहा मेलेलीं जनावरें ( नाक ओवाळीत ) काय घाण ही कुजलेल्या मांसाची.

संभाजी—हं. कविजी सावध असा बरें कां ? इथेंच जवळपास कोठें तरी वाघ असला पाहिजे ( गुरगुरणें ऐकूं येतें ) हें पहा गुरगुरणें ऐकूं येऊं लागलें. वाघाची झडप ती कोठून आणि कशी येईल याचा नेम नाहीं. हां सावध रहा

कलुषा—सरकार आपण तरवारसुद्धां शिकारीला आणली नाहीं हा काय अविचार !

संभाजी—( बेफिकीरपणें ) अरे काय करायची आहे तरवार. तरवार, बंदुकीनें बायकांनीं शिकार करावी. असलीं केक वाघें मीं जमिनदोस्त केलेलीं आहेत. प्रहर प्रहर वाघाशीं कुस्ती खेळणें हा तर माझा नित्य क्रम असे. हत्तीची सोंड पिरगाळून त्याला जागच्या जागीं डांबून टाकणारे हे बाहू... ( डौलानें आपल्या मनगटाकडे पहातो. कलुषा तखरीफखानाला खूण करतो व तखरीफखान तयार असल्याचें दाखवितो. )

कलुषा—( वाघाचें गुरगुरणें ऐकू येतें तिकडे बोट करीत, ) सरकार; सावध असा. वाघ जागा झाला.

संभाजी—ठीक आहे येऊं दे अंगावर. घेतों त्याचा समाचार.

कलुषा—सरकार, तो आपल्याला भीत असावा तो पुढें येत नाहीं. आपणच त्याच्यावर चालून जावें. आपण मोहोरा करावा मी आपली पिछाडी संभाळतों.

संभाजी—( हंसून ) कशाला एवढें जिवावर उदार होतां ? तुम्ही आपला जीव संभाळा, म्हणजे मग ती आणखी काळजी नको.

कलुषा—( स्वगत ) राजानीं केलेल्या भ्याडपणाची ही माझी थट्टा कशी पण वर्मी लागते आहे ( दात ओठ खात ) ( स्वगत ) काय करावें बाकीं पाप भितरें असतें असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. माझे पाय असे लटपटूं लागले आहेत आणि छाती अशी धडधडूं लागली आहे कीं ( कापूं लागतो. ) जय विंध्यवासिनी, जय कालीमाते, जर का ऐन वेळेला कारस्थानाचा स्फोट झाला, तर हा नारसिंह ( अंगावर शहारे आणीत ) खरोखरीच बिन हत्यारानें आपली शिकार करील. ( लटपटूं लागतो व वाघाची डरकाळी ऐकूं येते. )

संभाजी—( पोषाख सांवरून ) कविजी आतां तुम्ही व्हा बाजूला. मीच करतों हल्ला वाघावर ( पुढें चालू लागतो व कलुषा पळतो. इतक्यांत तखरीफखान त्यास चारी बाजूनें वेढून धरतो त्याची व तखरीफखानाची धरपकड होत असतां ) शाबासरे बहादूरांनो वारे भागूबाई ! मर्दुमकींत टिकाव लागेना म्हणून अशी विश्वासघातानें माझी शिकार करावयाला पहातां काय ? या, असाल तेवढे माझ्या अंगावर या मी आज भवानी मातेला सर्व बोकड बळी देतों. ( मारामारी सुरूं होते. संभाजी पटापट सर्व सैनिकांना आपटीत सुटतो. ) अरे नीचा कलुषा, शिकारीच्या निमित्तानें माझीच शिकार करूं पाहातोस काय ? तुला गळ्यांतला ताईत केला तों असा केंसानें गळा कापायला निघालास काय ? ( कलुषा पळूं लागतो त्याला तखरीफखान पकडीत. )

तखरीफखान—कविजी असे पळूं नका. आतां मराठ्यांच्या हातांत सापडलांत तर ते तुम्हांला फाडफाडून खातील. तुम्ही आमचे आश्रयाला चला. सरकारी बंदोबस्तांत ठेवतों तुम्हांला. ( इतक्यांत संभाजीस बाण लागतो. तो ओरडतो. )

संभाजी—अरे नीचांनो, नामर्दांनो माझा असा घात केलांत काय ? ( विव्हळ होतो, त्याबरोबर मुसलमान त्याला मागाहून पकडतात. तखरीफखान कलुषाला त्याच्या समोर आणतो, कलुषाला पाहून उसळून) अलमगिरा; तूं आपलें कार्य युक्तीनें साधलेंस याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. पण हा कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ झाला ह्याचा मला जीव घेऊं दे. ( कलुषावर धांवून जातो व शिपाई त्यास मागें ओढतात. )

---

## प्रवेश ८ वा.

( दौलती. अर्धा हिंदूचा व अर्धा मुसलमानाचा ड्रेस करून प्रवेश करतो. )

दौलती—आतां कोणाचाही जय होवो? लगेच अशी पगडी फिरवावी ( पगडी फिरवून दाखवितो. ) आतां कोणीहीं दम देवो, लगेंच अशी बाजू बदलावी. ( बाजू बदलतो. ) तरवरीफखानानें छत्रपती संभाजी महाराजांना कैद करून बादशहापुढे नेलें आहे म्हणतात. ते त्या वाघाच्या जबड्यांतून पुन्हां सुटले तर आम्ही हिंदू, नाहीं तर ( इतक्यांत दाऊद लढाईचे वेषानें व अवेशानें दोन मुसलमानांसह प्रवेश करितो).

दाऊद—कोई हिंदू है.

दौलती—( त्याच्या पुढें मुसलमानी बाजू करून उभा राहातो. ) मी मुसलमान आहें ( दाऊद दुसऱ्या बाजूस मारतो. )

दाऊद—हम हिंदूकू मारके चले जायेंगे. ( ओरडत दौलती खालीं पडतो. ) [ दाऊद जातो. ]

दौलती—( ओरडतो ) मैं मुसलमान हूं ( इतक्यांत मराठे सैनिक प्रवेश करितात. दत्ताजी त्याच्याकडे पहात )

दत्ताजी—ठोका त्या मुसलमानाला ( सर्व त्याला ठोकतात दौलती ओरडतो. मराठे निघून जातात व कांहीं वेळानें उठून बसून अंग चोळीत स्वगत. )

दौलती—हिंदु मुसलमानांची एकी करण्याकारितां मी हा अवतार घेतला पण दोघांनाही माझी पर्वा नाहीं. आता कोणत्या तोंडानें रडूं ! मुसलमानी तोंड वाद्य वाजवूं देणार नाहीं. आई आई! आतां हिंदु तोंडानेंच शंख

ध्वनी करतों झालें ! ( ओरडतो इतक्यांत दाऊद येतो व त्याचे अंगावर ओरडतो.)

दाऊद—ये तेरा मूहका बाजा बंद करो. बाजूमें मसजीद है.

दौलती—( त्रासून ) चल मुल्ला होऊन तुझ्या मसजीदमध्यें ओरडतो.

दाऊद—हाँ ये चलेंगा. तुम पहिला इस्लामी बनजाव और फेर बाजा बजाके पेट भरले व हिंदू लोक शादीके बखत तेरेको बुलाएंगे.

दौलती—( हताशपणें ) काय करावें ? बखत पडे बाका तो तुमले कुच म्हणावे काका.

दाऊद—तुम पहिला हिंदुस्थानी यहां उडदू शिक ले.

दौलती—हा अगोदर मुसलमान होतो मग काय ? अल्ला मेहेरबान सो गधा पेहेलवान.

---

## प्रवेश ९ वा.

स्थळ—औरंगजेबाचा दरबार.

पात्रें—औरंगजेब व मानकरी.

कलुषा—शहानशहा ! ! माझ्या अमोल कामगिरीचें तूं मला असेंच बक्षीस देणार काय ?

औरंगजेब—( रागानें ) अलबत ! तुला हेंच बक्षीस योग्य आहे. विश्वासघाताला विश्वासघाताशिवाय दुसरें कोणतें योग्य बक्षीस आहे ?

कलुषा—( चिडून ) मी काय विश्वासघात केला ? मी तुझी कामगिरी योग्य प्रकारें बजावली. उलट, तूंच माझा विश्वासघात केलास. जहागिरीची लालूच दाखवून माझ्याकडून हें अघोर कृत्य करविलेंस आणि आतां त्याचें बक्षीस माझा अमानुषपणें वध करायला तूं सिद्ध झालास हेंच...

औरंगजेब—ज्या धन्याचें जन्मभर अन्न खाल्लेंस त्या धन्याशीं असा विश्वासघात केल्यावर तुझ्यावर विश्वास कसा ठेवावा ?

कलुषा—( चडफडत ) शहानशहा, माझ्या पापपुण्याचा मी जबाबदार आहे,पण कामगिरी करून घेतल्यावर माझें बक्षीस बुडविण्याचा तुम्हांला तरी कोणत्या धर्माच्या आधारानें अधिकार पोंचतो ?

औरंगजेब—( हंसत ) राजकारणांतील सगळींच अभिवचनें आम्ही पुरीं केलीं, तर आम्हांला आमचें राज्य वाटायला पुरणार नाहीं. राजकारणांत कांहीं कामें बाक्षिसाच्या आशेनें, तर कांहीं प्रत्यक्ष बाक्षिसानें करून घ्यावीं लागतात. तशांतून तुझें बक्षीस मी शब्दशः खरें केलें आहे.

कलुषा—( एकदम ओरडून ) काय ?

औरंगजेब—तुझ्या कामगिरीप्रमाणें तुला मी योग्य बक्षीस देईन असें मी तुला अभिवचन दिलें होतें. मग मी तुला देत असलेलें बक्षीस योग्य नाहीं असें कोण म्हणेल ?

( कांहीं पठाण संभाजीस कैद करून आणतात. )

संभाजी—( प्रवेश करीत ) अगदीं योग्य, यथा योग्य. अलमगिरा तुझ्या सर्व आयुष्यांत तूं ही पहिलीच न्यायाची गोष्ट केलेली दिसते.

औरंगजेब—( आनंदानें ) पहा हिंदुधर्मसंरक्षक गोब्राम्हणप्रतिपालक तुमच्या छत्रपती सरक[illegible] सुद्धां हा निकाल न्यायाचा ठरविला आहे.

कलुषा—गुणाचा उपयोग करून घेतल्यावर गाढव ठरविणारे राजे तेवढे इथून तिथून सारे सारखेच.

औरंगजेब—( रागानें ) जा, अगोदर याची गाढवावरून सर्व लष्करांत धिंड काढून ह्याचें शीर कापून लष्करांतील शिपायांना चेंडूप्रमाणें खेळावयाला द्या; आणि ह्याच्या देहाचे तुकडे तुकडे करून ते कोल्ह्या कुत्र्यांना खावयास द्या.

( शिपाई त्यास ओढीत नेतात. )

संभाजी—( कलुषाकडे पाहात हंसून ) छत्रपतींच्या गादींतील हा ढेंकण कोल्ह्याकुत्र्यांना मेजवानी देणार म्हणायचा.

औरंगजेब—( आनंदी मुद्रेनें ) शंभु राजा मी आज तुझ्यावर दया करणार आहे.

संभाजी—( छद्मीपणानें हंसून ) औरंगजेब आणि दया ! मग सैतानाचीच बुद्धी फिरली म्हणावयाची. दिल्लीच्या सिंहासनावर चढतांना ज्यानें आपल्या बापाच्या व भावांच्या देहांच्या पायऱ्या करून त्यांच्या रक्तांत आपलीं राज्यवस्त्रें भिजविलीं तो अलमगीर कुणावर दया करील ही गोष्ट प्रत्यक्ष पैगंबरानें मला सांगितली तरी खरी वाटणार नाहीं.

औरंगजेब—( हंसून ) हक्काची गादी मिळविण्यासाठीं जास्त खून कोणी केले याची वाटाघाट करावयाला आपण दोघेही नालायक आहोंत. तशांतून जवळच्या नात्याचा प्रश्न आडवा आला तरी नातें हें जन्मसिद्ध मानण्यापेक्षां मी कर्मसिद्ध न मानायला जास्त तयार आहे. रणांगणांत जीव घेणें जसें पाप ठरत नाहीं त्याप्रमाणेंच राजकारणांत मेल्या मुडद्यांना मोल नाहीं. जगेल तो मर्द आणि मरेल तो नामर्द हा एकच सिद्धांत राजकारणांत बरोबर आहे

संभाजी—( कंटाळून ) अलमगिरा, मी आतां राजसंन्यास घेतला आहे. तुझ्या मुखांतून तरी मला आतां राजकारणाचे धडे ऐकण्याची जरूरी नाहीं. मला येथें कां बोलाविलेंस तें लवकर सांग.

औरंगजेब—राजा, राज्याबद्दल तूं इतका निराश होऊं नकोस, मी तुझें राज्य तुला दान द्यावयास तयार आहे.

संभाजी—( उसळून ) अरे जा काबुलांतल्या मुषाफरा. तूं काय मला माझें राज्य दान देतोस. क्षत्रीयानें ब्राम्हणाला राज्य दान दिल्याचें उदाहरण आमच्या पुराणांत आहे. तुझ्या कुराणांत नाहीं एवढेंच नव्हे तर जगाच्या कोणत्याही धर्माच्या इतिहासांत तुला तें मिळणार नाहीं. अरबस्तानचा सौदागर हिंदुस्थानचें राज्य हिंदूला दान द्यायला निघाला ! ! हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ! ! माझ्या राज्याबद्दल मला आतां मुळींच काळजी नाहीं. हिंदूंचें राज्य माझ्या बापानें स्वर्गस्थ श्रीशिवाजीमहाराजांनीं जसें तुमच्यापासून हिसकावून घेतलें तसेंच माझा भाऊ—माझा बाळ दुसरा शिवाजी, तुझ्या तोंडांत मारून आपलें राज्य परत घेईल.

औरंगजेब—( विकट हास्यानें ) कुठला तुझा भाऊ ? आणि कुठला तुझा मुलगा, लवकरच ते तुझ्या भेटीला येतील, आणि तुझ्यासारखी त्यानींही माझ्याशीं जिद्द केली तर तेही तुझ्याप्रमाणेंच...

संभाजी—कत्तल केले जातील ? असेंच की नाहीं. नाहींतरी कोणता जातिवंत मराठा वीर शत्रूकडून पाडाव झाल्यावर जगण्याची इच्छा करील ? स्वतः च्या सिंहासनावर शत्रूला पाहण्यापेक्षां क्षत्रियानें मेलेलेंच बरें. छत्रपतींचा निर्वंश करून मराठेशाही बुडेल, अशी जर तुझी खुळी कल्पना असेल तर ती साफ चुकीची आहे. छत्रपती ही हिंदूपदबादशाहीची उत्सव मूर्ति आहे,

पण मराठेशाहीचा खरा प्राण प्रत्येक मराठ्यांच्या नसानसांतून धगधगतो आहे. तूं ह्या मूर्तीचा भंग करण्याला पुढें हो कीं, प्रत्येक मराठा संभाजी बनून सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून डरकाळया फोडीत तुला फाडून खायला येतो कीं नाहीं बघ !

औरंगजेब—( हंसून ) शिवाजीचा मुलगा बोलण्यांत असा बांका असेल ही मला कल्पनाही नव्हती. बकवा करण्यांत तरी तूं शेरखांचा आव आणतो आहेस, पण मृत्यूच्या जवळ गेल्यावर...

संभाजी—हा छत्रपती तुझा कैदी झाला त्याच दिवशीं मेला असें सर्व दुनिया समजते; मीही तसेंच समजतों. सिंह पिंजऱ्यांत पडल्यावर मरावयाचा काय बाकी राहातो ? लोकदृष्टीला त्याचा देह दिसतो परंतु तो सिंहाचा नसून कोंकराचा असतो.

औरंगजेब—( आनंदानें ) शंभुराजा तुझें तारुण्य, तुझें सौंदर्य व तुझें शौर्य पाहून अकालीं आटोपणारें तुझें चारित्र—अरेरे तुझ्या आशा—तुझ्या महत्वाकांक्षा ?

संभाजी—हिंदुधर्माचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. मी छत्रपतीच्या कुळांत पुन्हां जन्मास येऊन आसेतुहिमाचल हिंदुस्थानचा सम्राट होईन आणि मुसलमानी सत्तेचीं पाळेंमुळें खणून काढीन.

औरंगजेब—( हंसून )तूं पुन्हां जन्माला येईपर्यंत हिंदूंचें राज्य तरी टिकलें पाहिजे ना ? आज ओठाजवळचा प्याला दूर कां करा. आज आपल्या आयुष्याची माती करून उद्यांच्या आशेवर जीव सोडणें अगदीं मूर्खपणाचें नाहीं का ?

संभाजी—तुझ्या कोणत्याही उपदेशाचा अगर आमिषाचा माझ्या मनावर परिणाम होणार नाहीं. तुला काय माझा निकाल लावावयाचा असेल तो एकदां अमलांत आण.

औरंगजेब—तुला मुसलमान करावें अशी माझी इच्छा आहे

संभाजी—(छद्मीपणानें हांसून) तुझी इच्छा ! तुझ्या पोरीला नाटकशाळा करावी अशी माझी इच्छा आहे.

औरंगजेब—( संतापून ) छत्रपती, आपण अमर्याद भडकत चाललां !

संभाजी—तुझ्या पोरीइतकीही आम्हांला आमच्या धर्माची चाड असूं नये काय ? छत्रपतीचा हिंदुधर्म म्हणजे काय बाजारचा कुत्रा समजलास. भाकरीच्या तुकड्यावर नाहींतर जिवाच्या आशेवर विकत घ्यायला ? अलमगिरा लक्षांत ठेव. धर्माकरितां प्राण देणाऱ्या क्षत्रियाचा हा बेटा· आहे. साक्षात पैगंबर खालीं उतरला आणि त्यानें पृथ्वीचें राज्य देऊन जरी "चिरंजीव " पणाची सनद ह्या संभाजीला करून दिली, तरी हा हिंदूंचा छत्रपती आपल्या धर्माचा सवदा करणार नाहीं. उलट सौदा करूं पाहणाऱ्या तुझ्या इस्लामी धर्माचा मी धिःकार धिःकार करतों.

औरंगजेब—इस्लामी धर्माचा धिःकार करणाऱ्या काफराची जबान छाटली जाते. कातडें सोललें जातें. डोळे काढले जातात आणि जीव हाल हाल करून कुत्र्याच्या मोतीनें मातीमोल केला जातो हें तुला अजून ठाऊक नाहीं ? कोण आहे रे ? शिद्दी ? ह्या हिंदूला घेऊन जा आणि परम पूज्य पैगंबराची निंदा केली म्हणजे जी शिक्षा काफराला देतात ती ह्याला द्या—काफीर जिद्द करतो माझ्या समोर नेस्तनाबूद करो—कत्तल करो ! !

संभाजी—( हंसत ) मरणाची भीति कोणाला ? काळाच्या जबड्यांत हात घालून त्याचे दांत मोजणाराला ! ( इतक्यांत त्याला शिद्दी धरतात. ) अलमगिरा, हिंदुधर्माचा जिवंतपणा दाखविण्यासाठीं हा संभाजी बेगुमानपणें आपल्या जिवाची कुरबानी करीत आहे. माझ्या जगण्यापेक्षां माझ्या मरणाचीच हिंदुधर्माला आतां आवश्यकता आहे. ( जातां जातां, ) 'मरावें परी राष्ट्रधर्मा स्मरावें जय जय रघुवीर समर्थ.'

---

## प्रवेश १० वा.

**स्थळ:**—रस्ता. पात्रें—दौलती व दत्ताजी.

( दौलती मुसलमानी वेषांत येतो. )

दौलती—काय करावें ? यावेळीं महाराष्ट्रांत मुसलमानी पादशाहात होणार असें वाटून मी मुसळमान झालों. पण आतां ! अमलागिराची पाठ फिरतांच मराठे जोराला चढून, लागले आहेत मुसलमानांचे कांडात काढायला ! आतां कसें करावें ? आतां आमच्यासारख्या बाटग्यांची आली

पुन्हां कत्तलची रात्र. आतां रहीम म्हटलें की हिंदु जबरीनें राम म्हणावयाला लावणार ( विचारांत पडतो ) आपल्याला काय, गंगा गये गंगादास, जम्ना गये जम्नादास व्हावें झालें पुन्हां हिंदु. हो पण हिंदूचा मुसलमान होतो, तसा मुसलमानाचा कोठें हिंदू होतो आहे. (विचारांत पडतो ) बज्याजी निंबाळकर कसा थोरल्या महाराजांनीं पावन करून घेतला, तसाच ( इतक्यांत दत्ताजी प्रवेश करून )

दत्ताजी—तसाच तुला आम्ही मुसलमानाचा हिंदु करून घेतों चल.

दौलती—कोण दत्ताजी, मला तूं चल म्हणतोस. पण जायचें कोठें, असें कोणतें ठिकाण आहे कीं, त्या ठिकाणीं पश्चातापपतितांना तेथें पावन केलें जातें ?

दत्ताजी—तुळापुरला. छत्रपती संभाजी महाराजांची समाधी हेंच महाराष्ट्राचें पावनतीर्थ झालें आहे. तेथें दुसरें कांहीं करावें लागत नाहीं समाधीला एक मुजरा केला कीं, लगेच मुसलमानाचा हिंदु होतो.

दौलती—( आश्चर्यानें ) बस येवढेंच ?

दत्ताजी—खाणें पिणें आणि वागणें यांत जरासा फरक केला कीं, जशी परधर्माची दीक्षा घेतां येते, त्याचप्रमाणें पुन्हां हिंदुधर्मातही येतां यावें, म्हणून हा सोपा उपाय काढला आहे. तुळस खावी तीर्थ प्यावें व समाधीला मुजरा करावा कीं, झाला पुन्हां मुसलमानाचा हिंदू ( दौलती नाचूं लागतो )

दौलती—वा ! आतां जाली मजा ॥ आम्ही पुन्हां ही हिंदू होणार ॥ कोणी कसाही हिंदू होणार ॥

दत्ताजी—चल तर लवकर. ( दोघेही तुळापुरीं जातात. ) ( तुळापुरीं संभाजीचे समाधीजवळ कांहीं पोरें गाणें गात असतात व एक कुणबी समाधीची पूजा करून )

**धन्य संभाजी महाराज, राखीली हिंदूंची हो लाज, धन्य संभाजी महाराज । राखीली धर्माची हो लाज ॥ ध्रु० ॥ ते हे शिवसिंहाचा छावा । मेरू धीराचा, रवि शौर्याचा लोपला हो आज ॥ १ ॥ हा रणगाजी पुत्र शिवाजी, जरि तानाजी, मुरार बाजीमागे पडले आज ॥ २ ॥ अलमगीरासमान शत्रू होऊनीं जर्जर दिलमेले**

हर, कांपवि शिरीचा ताज ॥ ३ ॥ पेद्दु फिरंगे गोवेवाले ऐकुनीं नांवा भरती नवा पळती घेऊनी जहाज ॥ ४ ॥ धर्मासाठीं देशासाठीं हिंदुसाठीं देवाभेटीं गेला छत्रपती हा आज ॥ ५ ॥ दर्यावर्दी काळ शिद्दी सरली सद्दी केली गर्दी उतरी त्याचा माज ॥६॥ वीर समाधी दर्शन आधी जातील व्याधी लढातिल प्यादी कराच मुजरा आज ॥ ७ ॥

कुणबी—गड्यांहो ? इतकं ग्वाड गान तुम्हास्नी कोनी शिकावलं.

पोरें—हातल्या एका बामन कुळकन्यांन.त्यो हत रोज येतो पण लई चांगला मानूस हय पण. त्यो हत आला मंजी पार पार या महाराजांच्या समाधीवर डोस्क ठेऊनशान रडतो. ( इतक्यांत कुलकर्णी येतो ) हेच पगा ते बामन बुवा.

ब्राह्मण—( नित्याप्रमाणें समाधीस वंदन करून ) अजूनहीं ह्या समाधीकडे लोकांचें लक्ष लागूं नये अं ! दुर्दैव राष्ट्राचें कीं दुर्दैव धर्माचें. मेल्या मनुष्याचे देव्हारे माजवावेत मुसलमानांनींच. हिंदूना, त्याची कदर नाहीं. शंभु राजा, तुझ्यासारखा धर्मवीर जगाच्या इतिहासांत एक तरी झाला आहे काय ! काय तुझें शौर्य, काय तुझें धैर्य आणि काय तुझें औदार्य !! तूंच खरा आर्य ! ऐन तारुण्यांत राज्योपभोगावर लाथ मारून बायकांमुलांचा मोह आवरून निव्वळ आपल्या धर्मासाठीं, आपल्या देशासाठीं जिवाजी कुरवंडी केलीस धन्य ! राजा धन्य ! छत्रपती धन्य !! तूं खरा शिवसिंव्हाचा छावा आहेस. क्षत्रीय कुलावतंस गोब्राम्हणप्रतिपालक—हिंदुधर्म संरक्षक ही बिरुदावली तुलाच शोभते. तुझा हा आत्मयज्ञ—तुझें हें बलिदान महाराष्ट्राला स्फूर्तिदायक होवो. तुझी ही समाधि महाराष्ट्राचें पावनतीर्थ होय. ( गुडघे टेकून वंदन करतो. इतक्यांत दौलतीसह दत्ताजी येतो. )

दत्ताजी—दौलतराव हीच ती समाधी. हेंच तें पावनतीर्थ. ( दोघेही समाधीस वंदन करतात. ) दौलतराव झालांत आतां तुम्ही हिंदू. धर्मवीराच्या नुसत्या दर्शनानेंच पतित पावन होतो. ह्याला कुठल्याही शास्त्र धर्माचा कीस काढायला नको. 'देव भावाचा भुकेला ' असें आपले संत म्हणतात. भावना हा कर्मापेक्षां श्रेष्ठ आहे. धर्माचें स्थान अंतःकरण आहे. पोट नाहीं. पोटांत

कांहीं गेलें असलें तरी अंतःकरणांत भावना आहे तोंपर्यंत धर्मांतर होणें शक्य नाहीं. ( सर्वजण पुन्हां वंदन करतात. )

ब्राम्हण—दत्ताजी, शाबास ! माझ्या उपदेशाचा तूं चांगलाच फैलाव करतो आहेस. म्हणा 'धर्मवीर श्री छत्रपती संभाजी महाराज की जय' ( मुलें पूर्ववत संभाजीचें स्तवन गातात. )

सर्वजण—पद ( चाल आला शुभकाळ. )

घे धर्मरक्षणाला । अवतार नंदबाला ॥ ध्रु० ॥ ग्रासीतसे आम्हांला । परकीयधर्मी ॥ हरण्यासिया तमाला । घे धर्मरक्षणाला ॥ १ ॥ गीतावचा स्मरोनी । धर्मार्थ घेई ॥ अवतार हिंद भूचा । घे धर्मरक्षणाला ॥ २ ॥

॥ वंदेमातरम् ॥

---


# मुकुलिका अर्थात भा. वि. देवासकरकृत काव्यसंग्रह.

## प्रस्तावना

### लेखकः—प्रो. चिं. वि. जोशी प्रसिद्ध विनोदी.

आनंद, सहविचार, केसरी, नवाकाळ वगैरे

नियत कालिकांनीं प्रशंसिलेलें—

पुस्तकें मिळण्याचा पत्ताः—पोटभरे ॲन्ड सन्स बुकसेलर्स, आणि पब्लीशर्स. रावपुरा रोड, बडोदें—किं० ।≈ टपालखर्चासहः—।≈ आणे.

# नशीबाची परीक्षा.

जगांतील प्रत्येक गोष्ट कालाधीन असून कालावरूनच प्रत्येकाचे नशीबांत कोणत्यावेळीं काय घडणार हें कळतें. कै. लो. टिळक, ले० असेंब्लीचे प्रमुख सभासद यांचे संबंधींचीं भविष्यें तंतोतंत खरीं ठरलीं आहेत.

शुद्ध पंचांगाप्रमाणें शुद्ध पंचांगाप्रमाणें

## भविष्यविषयक सर्व कामें.

ज्योतिर्भूषण, ज्योतिषरत्न व ज्योतिषसुधाकर पंडित रघुनाथ शास्त्री यांच्या देखरेखीखालीं अत्यंत बारकाईने करून देण्यांत येतील. नक्की जन्मवेळ, कुंडली, आयुष्यांत घडलेल्या गोष्टींच्या कालदिग्दर्शनासह पाठवावी. उत्तरास १ आण्याचें तिकीट धाडावें. कामाची फी पुढीलप्रमाणें:—( १ ) जन्मटिपण १॥ रु. ( २ ) स्पष्ट ग्रहासह टिपण ५ रु. ( ३ ) त्रोटक वर्षफल ६॥ रु. ( ४ ) सविस्तर वर्षफल १५ रु. ( ५ ) पुढील १० वर्षांचीं दशाफलें १५ रु. ( ६ ) हयातीपर्यंतचीं दशाफलें २५ रु. ( ७ ) साडेसातीचें भविष्य १५ रु. ( ८ ) हयातीपर्यंतची त्रोटक पत्रिका ३० रु. मध्यमपत्रिका ५० रु. सविस्तर पत्रिका १००—२०० रु. ( ९ ) सामान्य प्रश्न १ रु. महत्वाचा प्रश्न ५ रु. नवीन दुकान काढण्याचा अगर वास्तुशांतीचा मुहूर्त ५ रु. ( मागील सर्व जाहिराती रद्द समजाव्या. )

म्यानेजर ज्योतिर्भूषण कचेरी, २४६ बुधवार पेठ,
पुणें शहर;

घाडगे पाषाणकर कंपनीचा

# ' उत्कृष्ट ' गुलकंद

देवी, गोवर, जीर्णज्वर, कोणत्याही तऱ्हेची कडकी, हातापायाची जळजळ, दोषिक तापापासून होणारी उष्णता, डोळ्यांतून नेहमीं पाणी वहात असणें, वगैरे सर्व विकार आमचे खास बागेंतलि हंगामी गुलाबाचा ' उत्कृष्ट ' गुलकंद सेवन केला असतां नाहींसे होतात. पचनक्रिया वाढवून प्रकृति सुदृढ होऊन शरीर निकोप होतें. ' उत्कृष्ट ' गुलकंद जुना व मुरलेला आहे. व्यापाऱ्यांस सवलतीनें भरपूर माल मिळेल. सकाळ व संध्याकाळ २ तोळे घेऊन वर पावशेर दूध पिणें.

आमचे दुकानीं लग्नमुंजी व इतर सार्वजनिक समारंभाकरितां उत्तम गुलकंद व हारतुरे मिळतील. बाहेरगांवीं पाठविले जातात.

मिळण्याचें ठिकाण:--फरासखान्याच्या

हौदासमोर बुधवार पेठ, पुना सिटी.

# जुन्या मोटारी

स्वस्त व नव्या

# उधार व हप्त्यानें

## मिळण्याचें

# एकच ठिकाण.

## भा. दी. गरवारे,

माधवाश्रम समोर.

मुंबई नं. ४.

# सुप्रसिद्ध पुणेरी पगड्यांचें दुकान

आमचेकडे खऱ्या जरीच्या घाटदार व वजनास हलक्या अशा तऱ्हेच्या पगड्या किफायतशीर भावानें मिळतील. शिवाय नाटकी सर्व तऱ्हेचे टोप व पगड्या आर्डरप्रमाणें मिळतील. तरी एक वेळ गिऱ्हाईकानें माल मागवून खात्री करून घ्यांवी. व्यापाऱ्यांस किफायतशीर भावानें माल मिळेल.

पत्ता:—बाबुराव मारुती बागडे.
पगडीवाले ४७१ बुधवार पेठ
पुणें सिटी.

---

## आपले मनाप्रमाणें फोटो काढून पाहिजेत ना?

तर मग आप्पाबळवंत चौकांत M. B. लिमये यांचे स्टूडीयोंत काढून घ्या.

आमचेकडे एनलार्जमेन्टसचीं कामें केलीं जातात. बाहेर गांवच्या आर्डर्स घेतल्या जातील.

## शारीरिक व्याधींवर बाह्य उपचारी अप्रतिम औषध.

# गजानन ब्रदर्स मेंथालीन

डोकें दुखणें, मस्तकशूळ, संधिवात, छातींत भरणें, विंचूदंश इ. वर गुणकारी औषध किंमत १० आणे. तीन बा. व्ही. पी. सह रुपये २.

लहान बा. ६ आणे. डझनास व्ही. पी. सह रुपये ३८१२.


गजकर्णावर अप्रतिम मलम, खरूज, नायटे, इसब, आगपैण, कनवट, चिडलेला चामडीचा कोणताही रोग साफ बरा होतो. किंमत ६ आणे.

सौभाग्यालंकार ओलें कुंकू व हळद, आवळेल तेल, कपाशीचें तेल, थंडगार काजळ इ. खात्रीचा माल मिळतो.

पत्ता:—( मालिक ) डी. एस. येवलेकर

गजानन ब्रदर्स, पुणेंसिटी.

---




अस्सल

## कस्तुरी उदबत्त्या

घरभर सुवासच सुवास करणाऱ्या

श्रीकेशव आणि कंपनी;

सुगंधी कारखाना,

सदाशिव, पुणें

# सुप्रसिद्ध बेडेकर मसाला

आमचा पत्ता लिहून ठेवा, आपण वापरतो तो मसाला चांगला आहे किंवा नाहीं; याचीं काळजी घ्या. आमचे दुकानी, गोडा मसाला, तिखट मसाला, गरम मसाला, मेतकुट, हळद बुकी, तिखट, वगैरे घरगुती सामान उत्तम मिळेल. आंब्याचे व लिंबाचे लोणचेहीं मिळेल. त्यांची प्रसीद्धी सर्वत्र आहे. तरी मसाल्याचे लोणचे वापरीत जा.

**पत्ताः—व्ही. पी. बेडेकर आणि सन्स.**

मुगभाट, गिरगांव, मुंबई. ब्रँच ठाकूरद्वारनाका

---

# औषध कोणतें घ्यावें?

## आयुर्वेद आचार धर्म आणि आयुरारोग्य

या विषयावर सुंदर व मुद्देसूद लिहिलेला आमचा निबंध वाचला असतां वरील प्रश्नाचें उत्तर बिनचूक नेमकें मिळेल. खालील पत्त्यावर फुकट मिळेल बाहेरबांवीं आमच्या पोष्ट खर्चानें पाठवूं.

**पत्ता—आतंक निग्रह औषधालय,**

रेमार्केट रोड आर्यन सिनेमाची पिछाडी

पुणें सिटी.

स्पेशल बनातीच्या
फोल्डींग टोप्या

लहान मुलां-मुलींचे
फॅन्सी ड्रेस

श्री शिवाजी



कॅप डेपो.

प्रार्थना समाज समोर

गिरगांव मुंबई नं. ४

पार्टीकरितां आमचाच चिवडा वापरतात

स्थापना १८—

एन. डी. छत्रे यांचा कोल्हापुरी सर्वोत्तम संगीत चिवडा

पत्ता:- एन. डी. वळणकर — कांदेवाडी, मुंबई ४

# मुलांमुलींच्या

# श्री ' समर्थ ' मेळ्याचीं पदें.

### पद १ लें.

चालः—( विमल अधर ). राग—हमीर. ताल—दादरा.

प्रथम नमन शिवकुमार हें घेई । स्मरण तवचि सौख्यदायीं ॥ ध्रु० ॥
नमितां दासें धांवुनि येसी । करिसि नतावन ॥ प्रथम नमन० ॥ १ ॥
जनता चित्तां, जागवि आतां; करि न प्रतारण ॥ प्रथम नमन० ॥ २ ॥

### पद २ रें.

चालः—( तिमिर पटल ). राग—भीमपलास. ताल—दादरा.

स्वसुख निरत लोक सकल । त्वरिं सदया धांवत या ॥ ध्रु० ॥
परवशता पाश प्रभो । कंठिं रुतत साच पहा ॥ १ ॥ सुरवर वैभव शिखरीं । झणिं विलसो भारत हा ॥ २ ॥ स्वजनवदन चमको नित । आत्मतेज तळपुनिया ॥ ३ ॥ विद्या कमला याव्या । हिंदभुवनिं खेळाया ॥ ४ ॥

### पद ३ रें.

चाल—( दे हाता या ). राग—सिंधोरा, ताल—त्रिताल.

त्वरिं धांवा या गिरिजासुता । ये द्रव झणिं तव मना, गजवदना; ही तुज याचना । दे हातां ॥ ध्रु० ॥ दुर्दैव रोष झाला । परपाश गळां रुतला । आसरा कुणी नुरला । स्वीकरिं ही विनवणी, आळवणी, आठवुनी मनीं । हो पाता ॥ १ ॥

पद ४ थें.

चाल--( खाजा कैतो ) राग-कॉफी-जिल्हा, ताल-केरवा.

कसा झाला हतबल बंधो । ऊठ ऊठ आतां ॥ धृ० ॥ करुणा जननीची । येत नाहिं तुला कां? झाली दिना । कोणी न त्राता ॥१॥

पद ५ वें.

चाल--( काय मागुं ). राग-वसंत, ताल-त्रिताल.

देइं दान अजि हेंचि गणेशा ॥ धृ० ॥ प्राणासम प्रिय माय जननिचा । कधिं न पडावा विसर आम्हांसी ॥ १ ॥ डोळ्यावरली झोंप उडवुनी । कार्यरत करीं सकल जनासी ॥ २ ॥ देशकारणीं देह पडावा । स्वार्थ नच करो मलिन मनासीं ॥ ३ ॥

पद ६ वें.

चाल--( आतां राग ) राग-बागेश्री ताल-झपताल.

प्यारा पंचप्राणांपरी देश माझा । शोभतो साच सम्राट राजा ॥धृ०॥ स्वर्गसुख सोडुनी आर्यभूमीमधें। आवडीनें रमे विश्वराजा ॥१॥

पद ७ वें.

चालः--( मन मोहन व्राजवी ) राग--मालकंस, ताल--त्रिताल

प्रभु देइल सौख्य नताला ॥ धृ० ॥ दीना अकरुण होईल कैसा । पालक जो जगताला ॥ १ ॥ प्रेमभरानें आळवितां हरि । देइल स्वातंत्र्याला ॥ २ ॥ अर्पियली जरि ही तनु, करुणा । येईल कां अधमाला ॥ ३ ॥

पद ८ वें.

चाल---( कैसी कटुंगी रतिया )

देवा कशि न करुणा तुला । दुबळ्या राष्ट्राची या ॥ धृ० ॥ भरदास्याला, कोणी भुलला । काया आपुलि विकली त्याला ॥ १ ॥ पदभाव तो, कोणा रुचला । मानी स्वजन रिपु तो भला ॥ २ ॥

पद ९ वें.

चाल—( करिन यदु मनिं ). ताल—त्रिताल.

अजुनि किती वंदूं तुजला । तिमिर पटलीं बघ देश बुडाला ॥ धृ० ॥ कोंवि अजापरि अचल बनला तूं करिं कंठरवाला ॥ १ ॥ रुधिर असें तव हृदयीं सुभटाचें । स्मर आजि तयाला ॥ २ ॥

पद १० वें.

चाल—( मदन सजविला वसंत आला ).

सदन नच उरें, झोंबत वारें । अवयव सारे कांपत बा, रे॥धृ०॥ रिपुगण सुजला, नाशनिं टपला । कोणि न तारक आज आह्मारे ॥१॥

पद ११ वें.

चालः—(सोडी नच मजवरीं). राग–मालकंस. ताल–झपताल.

दावि हरि झडकरीं अमर सुख, भारता । धन्य दिवस, मिळे तोचि जइं मुक्तता ॥ धृ० ॥ जरिं रक्त सांडुनीं, मुक्तिपद तें मिळें, तेंहि बघ अर्पिलें; कां न मग मुक्तता ॥ १ ॥

पद १२ वें.

या हो देवराया । करपत माझी काया ॥ धृ० ॥ विनती करित । तुमचे पाया ॥ १ ॥ कशि हो विनाशे । सदया माया ॥ २ ॥

पद १३ वें.

चालः—( प्रणति तुज राग–पूर्वी–ताल–झपताल

खचित प्रभु निशिदिनीं । ध्यास लागे मनीं । वैभवा चलिं वसो । त्वरित ही मेदिनी ॥ धृ० ॥ नयन गुंतो सदा । मायभू सुखपदा । जनानि गुण संपदा । कार्णि येवो जनीं ॥१॥ मुक्ततेच्या सुखा । देश हा पारखा । दूर दवडूं नका । हीच प्रभु मागणी ॥ २ ॥

पद १४ वें.

चाल—राग–भीमपलास ताल–दादरा.

धन्य तुझी निजसि सुखें, भुजगशयनिं ताता । विलासासि सोड सोड, उघडि नयन आतां ॥ धृ० ॥ देश सकल तळमळतो, पारतंत्र्य-

दाहें । पर-पीडित जीवन हें; धांव धांव नाथा ॥ १ ॥ बोल विफल तव सदया, आज हा ठरेना । विलासासि सोड सोड, उघाडि नयन आतां ॥ २ ॥

## पद १५ वें.

चाल—( चंद्रिका ही ) राग—दुर्गा, ताल—त्रिताल.

अजुनि कां बैसला बंधुनों । नेलें लुटुनी तरी । करुनि झणि जनीं जागृती, तारा सत्वर धांवोनी ॥ धृ० ॥ मान तनमन संपदा । परक्यांनीं लांबविलें । दीनासम दिसतसें मुख आतां कैसें दुबळें ॥ १ ॥ भारतमाता आपुली बाहते करुणारवें । ऐका, ऐका ती सांगते त्वरित या संगरीं ॥ २ ॥

## पद १६ वें.

चाल ( नयनें लाजवीत )राग—पहाडी—झपताल.

प्रभुजी आळवित, बहु जीव शिणला । तरी ये न द्रव त्वरित, कमलावर तुला ॥ धृ० ॥ रडवी आम्हां दैव हें गांजतांना । तुज वाहि तरि तूंचि आजि कसा झोंपला ॥

## पद १७ वें

राग—गज्जल—धुमाळी.

ऊठ ऊठ उघडी नयना नीट भारताहि आतां ॥ मायभूमि रुदन करी लेंकरें भुकीं मरतां ॥ ध्रु० ॥ कशि तुज घोर झोंप लागली या काळा ॥ या अळसानें तुझा गुंतला गळा । उत्साह पूर्वींचा गळला कां सगळा । नित्याची परवशता । रुचते कां भोगाया । धीर वीर तुझे पूर्वज, कुठें तूंच दैवहता । ऊठ ऊठ अजुनि करिं जा कांहीं तरी सार्थकता ॥ १ ॥

## पद १८ वें

राग—मांड ताल—केरवा

आतां प्रभुजी पुरे अबोला । किती आळवूं दयाळा देवा ॥ध्रु०॥ आम्हीं अज्ञ बालकें ना । लोटुं नका त्यांना ॥ आतां ॥ या लोकीं जवि

हा विठला । आजि सोडवा तयाला ॥ आलां ॥ झडकरी धांव घ्या नाथा । कां अंत हा पाहतां ॥ १ ॥

पद १९ वें.

चाल—( निशिदिनीं मनिं ) राग–भैरवी, ताल-त्रिताल.

बुधजन नति करुनी तुम्हांसी । निशिदिनीं विनती हीच पदासी प्राणदान करूं मायभूमिसी ॥ धृ० ॥ मायमाउली परपदिं पडली । अदय अरिकरीं बहुतचि शिणली । द्या हातां, झडकरिं तिजसी ॥ १ ॥

पद २० वें.

राग–भैरवी ताल–त्रिताल.

विनति चरणीं गोपाला । क्षमा व्हावी बाला ॥ धृ० ॥ गरिब हे बहु गांजिले । अपराध ना कळे । अधम असले । जिर्णे कसलें । आम्हा दिधलें । रमा–कांता ॥ १ ॥

पद २१ वें.

चालः—(ईश ठेवो श्रीमंत—)कोरस.

अल्प सेवाही रसिकहो । समर्थ मेळ्याची सतत तुह्मां । आवडोनीया, हृदयींचें प्रेम आह्मांतें विपुल मिळो । ही कृती सदा तुह्मां रुचो ॥ १ ॥

---

पद १ लें. चाल—( क्या मजा देते है यार ).

हें कुठलें फुटलें पेंव । ही धाड कोठुनी आली ॥ धृ० ॥ जा कुणीहि कडे हे असती । यांचीच सर्व जणुं वसती । मार्गांत विखुरलें दिसती । मोकाट गुरें जणुं सुटलीं ॥ १ ॥ मंदिरीं घरीं बाजारीं । मसणांत तुरुंग द्वारीं । जा कुठेंहि यांची स्वारी । चुकवितां बुद्धि बावरली ॥ २ ॥ भय सहन आगिचें करवे । अतिवृष्टि भयंकर पुरवे । स्वार्थासहि पुरुनी उरवे । या पुढें शक्ति परि हरिली ॥ ३ ॥ हा काय ईश्वरीं कोप । कीं त्यास लागली झोंप । पाहुनी हलुच हें रोप । उतरानि पसरलें खालीं ॥ ४ ॥ दुष्ट तरी असतिच मोठे । त्याहुनि ही वरचढ छोठे । क्रूर चोर कपटी खोटे । दुर्जनता पुरुनी उरली ॥ ५ ॥

5007

कथविति न छळांच्या रीती । वाटते पदोपदिं भीती । नच जाणति नीती अनीती । सारीच दुष्टता भरली ॥ ६ ॥ मच्छरासि मच्छरदाणी । रोगावरिं औषध प.णी । परी यांच्या वरती अजुनी । कोणा न औषधी सुचली ॥ ७ ॥ अभिषेक शिवाला करवा । जोगवा देविचा फिरवा । कुणि कडुनी पिक हें जिरवा । शतवरुषें नातरि भरलीं ॥ ८ ॥ संबंध कधींहि न यावा । ठेविती भयंकर दावा । घेतलाच हरहरा चावा । ' ढे ' पुढें शुद्धि नच उरली ॥ ९ ॥

पद २ रें. चाल:—( गज्जल )

कुणाला दास्य तें प्यारें । कुणाला आत्महित सारे । अम्हाला एक तें ठावें । स्वदेशा प्राण अर्पावें ॥ १ ॥ कुणाला नौकरी प्यारी । कुणाला बेडि सोनेरी । आम्ही स्वातंत्र्य-प्राप्तीला । अतां हा देह वाहियला ॥ २ ॥ परांनीं देश वेढियला । कसा मग स्वार्थ तो रुचला । उशाला सर्प असतांना । अहा, ती झोंप येइ कुणा ॥ ३ ॥ मराठ्या मर्द होतासी । कसा तूं दीन झालासी । जरा धर स्वाभिमानाला । मनीं स्मर शूर शिवबाला ॥ ४ ॥ मुसल्मिन्हिंदु भाईनो । हिंदुस्तान-पुत्रांनो । जिवाला जीव देऊं या । स्वराज्या आजिं मिळवूंया ॥ ५ ॥

पद ३ रें. चाल—( सबसे रामभजन ).

जा सरसावुनि मतिमंदा; उठ, हा घे भाला हातीं ॥ धृ० ॥ मातेला तव लोटुनि दिधलें पारतंत्र्यकूपीं । तो शत्रू ये अजि हरण कराया । भार्येला बघसी कसें हें राहुनिया जगतीं ॥ १ ॥ त्या भीमाचें अभिमन्यूचें परिसुनि नाम तुवा । स्फुरण येउनी भुजा थोपटुनि । कां न उठसि लढण्याला; कशि गत होय तुझी पुढतीं ॥ २ ॥ शिवबा अमुचा जगन्महात्मा पुतळा शौर्याचा । त्या म्हणति लुटारू नीच मर्कटें । कसें सहन हें करिसी, कां रे होसी मूढमती ॥ ३ ॥ षंढ म्हणुं तरि शिवबा बाजी तानाजीचा बच्चा तूं । रोमरोमिं मग कां न सळसळे । तप्त-रक्त, कैसी निमाली स्वाभिमान ज्योती ॥ ४ ॥ स्वशरीराचें लचके तोडुनि रक्त-मांस खावें । परि न करावें अन्न भक्षणा । लोंबे परवशता, सुरी ही जों मानेवरती ॥ ५ ॥

# प्रकाशकाचें चार शब्द

श्रीसमर्थांच्या कृपेकरून मुलांमुलींच्या ह्या श्रीसमर्थ मेळ्याला यंदा सातवें वर्ष सुरूं झालें. त्यांच्याच कृपेनें अनुकूल प्रतिकूल टिकेच्या भोंवऱ्यांत आम्हांला आमचा मार्ग काढतां आला.

पालकांचे आभार शब्दांत व्यक्त करतां येणार नाहींत. आपलीं लहान मुलें आमच्यावर विश्वास ठेवून ते धाडतात हा त्यांचा मोठेपणा होय.

दोन संवादांपैकी ' पावन तीर्थ ' हा संवाद रा. सर पोतदार यांनीं लिहिला आहे. तो त्यांच्या कीर्तीला साजेसा झाला आहे. त्यांतील शुद्ध विनोद सहृदय वाचकांस हालवून सोडील. दाढी शेंडी वरील सरस विनोद हांस्याच्या लाटा उत्पन्न करील. हा संवाद—आपल्या अनेक व्यवसायांत, वेळांत वेळ काढून लिहून दिल्याबद्दल—या कसलेल्या लेखकांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

दुसरा संवाद देवासकरांचा आहे. स्वराज्य—मूर्ती शिवरायाच्या आयुष्यांतील सर्वांत बिकट प्रसंग म्हणजे अलमगीराची मुलाखत हा होय. हा प्रसंग कोणत्याही महत्वाकांक्षी नाटककाराचें लक्ष आपल्याकडे ओढून घेईल. श्री शिवरायाची स्वराज्यसंपादनाची कामगिरी ऐन भरांत आली असतां स्वराज्यसंस्थापकावर हें संकट आलें. थोरांच्या चातुर्याची कसोटी अशा प्रसंगानेंच होत असते. अवरंगजेबाच्या प्रत्यक्ष राजधानींतून शिवरायांनीं आपली सुटका करून घेतली. नाट्यप्रसंगाची सजावट करतांना जर कोणाची ऐतिहासिक दृष्टी दुखावली गेली असेल तर त्याबद्दल वाचक व प्रेक्षक थोर अंतःकरणानें क्षमा करतील अशी आशा आहे.

आजपर्यंत मेळ्यानें खालील संस्थांना देणग्या दिल्या. १ पुणें कायदेभंग फंड ४० रु. २ पर्वती संस्थान ३० रु ( पाण्याकरतां ) ३ सांगली गर्लस् हायस्कूल १० रु. ( ४ ) त्र्यंबकेश्वर लोकमान्य वाचनालय ७२ रु. १० आ. (५) नांदगांव लोकमान्य वाचनालय—ज्ञानकोश सहा भाग (किं. रु. ६०)

( ६ ) जळगांव हिंदू सभा ७५ रु. ( ७ ) पुणें हिंदू सभा १०१ रु. (८) मुंबई हिंदू सभा १०१ रु. ( ९ ) विलेपार्ले लोकमान्य वाचन मंदीर ४० रु. ( १० ) मुंबई कॉंग्रेस हाउस व्यायाम मंदीर ७५ रु. ( ११ ) मुंबई ब्राम्हण सभा २५ रु. ( १२ ) दादर ब्राह्मण सभा ५७ रु. १० आ. ( १३ ) आर्यन एजुकेशन सोसायटी १ चांदीचा कप ( नमस्काराकरतां बक्षीस ) किं. १० रु. (१४) कुमार विनिमय मेळा १५ रु. (१५) नगर दुष्काळ फंड २०० रुपायांचे कपडे. ( १६ ) बडोदा ब्राम्हण सभा ७५ रु. ( १७ ) लोकमान्य स्मारक फंड ( रत्नागिरी ) ९१० रु. वगैरे.

या प्रमाणें श्रीसमर्थ मेळा जनतेची सेवा अल्प प्रमाणांत आपल्या सामर्थ्यानुसार करीत आहे. विरोधकांना 'प्रथमं वंदे' ' निंदकाचें घर असावें शेजारीं ' या उक्तीप्रमाणें त्यांच्याविषयीं आदर बाळगणें हेंच योग्य.

शेवटीं पुन्हां एकदां माधवराव बापट कवि मित्र. रा. सर पोतदार ले. भिडस्त मुंबईचे डॉ. भडकमकर शेट केळूसकर जोशी ॲन्ड सन्स समर्थ भोजन गृहाचे मालक व आमचे आश्रयदाते व देवासकर यांचे आभार मानून—संवादांतील प्रसंगास अनुसरून समर्थांच्या ओजस्वी शब्दांत ही प्रस्तावना पुरी करतों.

'धर्माकरितां मरावें । मारुनि अवघ्यांस मारावें । मरतां मरतां घ्यावें । राज्य आपुलें ॥ १ ॥

त्रिं. ग. बापट

REFBK-0003701

लो. टिळकांच्य REFBK-0003701 ा ह्या मेळ्याचा हा पद्यहार हिंदमातेला अ

मेळ्याच्या पदांचें नोटेशन पाहिजे असल्यास मेळ्याचें बिऱ्हाडीं भेटावें. एस. एस. विप्रदास, पेटी मास्तर ' श्रीसमर्थ ' मेळा पुणें.

मुद्रक:—शंकर रामचंद्र दाते, बी. ए. " लोकसंग्रह प्रेस, "
२७ बुधवार पेठ, पुणें.

प्रकाशक:—त्र्यंबक गणेश बापट, १९८, शुक्रवार पेठ, पुणें.

आजकाल

# 'डेक्कन' हें नांव म्हणजेच

* सफाईदारपणाचा, सुबक कामाचा व सचोटीचा *

# शिक्का मोर्तब होऊन बसलें आहे !

— त्याचा उपयोग करून आपल्या धंद्याला जोमदार —

# प्रसिद्धीकरणाची जोड द्या !

कारण

वाफेच्या इंजिनला वाफेची जितकी जरूरी आहे तितकीच

**धंद्याला प्रसिद्धीकरणाची आहे.**

(मागें पहा)

Deccan Printing Works, Poona City.